शनिवार, ६ एप्रिल २०२४
⊙ किंमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २२२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) SATURDAY 6 APRIL 2024 | adhunikkesari.com | ●YEAR-03 ●ISSUE-222 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-05

# पोलिसांना वरुन येणारा फोन बंद करावा

## हर्षवर्धन पाटील यांचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**इंदापूर : इंदापूर तालुक्यात पोलीस त्यांचे काम चोखपणे करतात. काही प्रकरणांमध्ये पोलिसांवर दबाव आणला जातो. खोट्यानाट्या केस टाकल्या जातात. जर एखाद्याचे चुकले असेल तर जरुर गुन्हा दाखल करावा. पण एखाद्या व्यक्तीला मारहाण होते आणि मारहाण करणारा व्यक्तीच अगोदर जाऊन पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करतो. अशावेळी पोलिसांना वरुन कोणाचा फोन येतो. वरुन येणारा हा फोन बंद करण्याचे काम गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करावे, असे वक्तव्य हर्षवर्धन पाटील यांनी शुक्रवारी इंदापूरमध्ये आयोजित मेळाव्यात केले.**



बारामती लोकसभा निवडणुकीच्यादृष्टीने सुनेत्रा पवार यांना इंदापूरमधून पाठिंबा मिळावा, यासाठी शुक्रवारी देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात हर्षवर्धन पाटील जुन्या गोष्टी विसरुन अजितदादा गटाच्या सुनेत्रा पवार यांना बिनशर्त पाठिंबा देतील, अशी अपेक्षा होती. मात्र, या मेळाव्यातील भाषणात हर्षवर्धन पाटील यांनी अजित पवार यांचा तोंडदेखला उल्लेख केला. तसेच अजित पवारांच्या उमेदवाराला मी सांगतो म्हणून नव्हे तर देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावर इंदापूरच्या जनतेने पाठिंबा द्यावा, असे हर्षवर्धन पाटील यांनी सूचित करण्याचा प्रयत्न केला. इंदापूरमधील हा मेळावा अजित पवार गट आणि हर्षवर्धन पाटील यांच्यातील समेटाचे प्रतिक म्हणून पाहिला जात होता. मात्र, या मेळाव्यात भाषण करताना हर्षवर्धन पाटील आणि त्यांची कन्या अंकिता पाटील यांनी फडणवीसांसमोर तक्रारींचा पाढा वाचला. तसेच विधानसभा निवडणुकीसाठी पाठिंब्याचे आश्वासन मिळावे, अशीही मागणी हळूवारपणे रेटण्याचा प्रयत्न केला.

**फडणवीसजी तुम्ही इंदापूरचं पालकत्त्व घ्या :** हर्षवर्धन पाटील यांनी या मेळाव्यात देवेंद्र फडणवीस यांना इंदापूरचे पालकत्त्व स्वीकारुन या भागाचा विकास करण्याची विनंती केली. बारामतीत फूट पडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील दोन्ही गटांची नेमकी किती ताकद आहे, याच्याशी आम्हाला देणंघेणं नाही. आमचे चार-पाच प्रश्न आहेत. ग्रामपंचायतीमधील आमच्या कार्यकर्त्यांना निधी मिळत नाही. सरपंच अवैध ठरवले जातात. आम्ही गावांमध्ये मतं मागायला जातो, तेव्हा लोकांना काय सांगणार? इंदापूर तालुक्यात भ्रष्टाचार वाढला आहे. या सगळ्याचा महायुतीवर कुठेतरी परिणाम होत असतो, याची दखल देवेंद्र फडणवीसांनी घ्यावी, असे हर्षवर्धन पाटील यांनी म्हटले.

चर्चेतील बातमी

## अमित शहा यांचा पूर्व विदर्भ दौरा अचानक रद्द

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** पूर्व विदर्भात प्रचारासाठी येणारे केंद्रीय गृहमंत्री व भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांचा सहा एप्रिलचा दौरा अचानक रद्द करण्यात आल्याची माहिती आहे. लोकसभेच्या पहिल्या टप्प्यात पूर्व विदर्भातील पाच मतदारसंघात १९ एप्रिलला मतदान आहे. त्यासाठी या भागात अमित शहा प्रचाराला येणार होते. ६ एप्रिलला त्यांची गोंदिया येथे सभा आयोजित करण्यात आली होती. येथे सुनील मेंढे हे भाजपचे विद्यमान खासदार निवडणूक लढवत आहे. दिल्लीहून नागपूरला येऊन शहा हेलिकॉप्टरने ते गोंदियाला जाणार होते. सभेची तयारी पूर्ण झाली होती. पण ऐनवेळी ही सभा रद्द झाल्याची माहिती आहे. दौरा रद्द होण्याचे कारण मात्र कळू शकले नाही. मात्र प्रकृतीच्या कारणावरून शहा यांनी दौरा रद्द केल्याचे सांगण्यात येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सुद्धा या भागात प्रचारासाठी येणार आहे. त्यांची ८ एप्रिलला चंद्रपूर येथे जाहीर सभा आयोजित करण्यात आली आहे. त्यानंतर ते नागपूर जिल्ह्यातील रामटेक लोकसभा मतदारसंघात सभा घेणार आहे. पूर्वी यासाठी १० एप्रिल ही तारीख निश्चित करण्यात आली होती.

# ३० लाख युवकांना नोकरी, महिलांना वर्षाला १ लाख ते शेतीमालाला हमीभाव

## काँग्रेसच्या जाहीरनाम्यात मोठ्या घोषणा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाने आज (ता. ५ एप्रिल) जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. या जाहीरनाम्यात पाच न्याय आणि २५ गॅरंटी देण्यात आल्या आहेत. यामध्ये युवा, रोजगार, मजूर, महिलांना १ लाखांची मदत, शिक्षण, शेतकऱ्यांना एमएसपीची हमी यासह ३० लाख नोकऱ्या देण्याचे आश्वासन या जाहीरनाम्यात देण्यात आले आहे. दिल्लीत पत्रकार परिषद घेत हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. यावेळी काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, सोनिया गांधी यांच्यासह आदी नेते उपस्थित होते. काँग्रेसने आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा 'ग्यान' (GYAN) या संकल्पनेवर अधारीत प्रसिद्ध करण्यात आला आहे. यामध्ये जी(G)- गरीब, वाय(Y)- युवा, ए (A)- अन्नदाता, एन (N)- नारी, अशी काँग्रेसची संकल्पना आहे.




**हे आहे जाहीरनाम्यात :** तीस लाख युवकांना सरकारी नोकरी देण्याचे आश्वासन, आरक्षणाची मर्यादा वाढवविण्याचे आश्वासन, सरकारी नोकऱ्यांमधील कत्रांटी धोरण रद्द करण्याचे आश्वासन, विद्यार्थ्यांचा छळ होऊ नये, म्हणून कायदा केला जाणार, गरीब महिलांना वर्षाला १ लाख रुपये देण्याचे आश्वासन, शेतकऱ्यांसाठी स्वामीनाथन आयोगाच्या धर्तीवर एमएसपीचे आश्वासन, शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाल्यास एका महिन्यात मदत मिळणार, शेतकऱ्यांच्या गरजेच्या सर्व गोष्टींवरील जीएसटी हटविण्याचे आश्वासन, असंघटित कामगारांसाठी दुर्घटना वीमा योजना आणणार, बेरोजगार भत्त्यासारख्या योजनांमध्ये चांगले पैसे थेट खात्यात देण्याचे आश्वासन, अग्निवीर योजना बंद करून जुन्या पद्धतीने भरती राबविण्याचे आश्वासन, पेपरफुटीचे प्रकार थांबविण्यासाठी योग्य निर्णय घेण्यात येणार, गॅस सिलिंडरच्या दरात कपात करण्याचे आश्वासन, पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी करण्याचे आश्वासन.

# पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची : सविता राणी पुणेकर

आधुनिक केसरी न्यूज

किरणकुमार आवारे

निफाड : लाज धरा पाव्हणं जरा, जनाची मनाची, जनाची मनाची, पोटासाठी नाचते मी पर्वा कुणाची.. अहो ध्यान धरा जरा, हिची कदर करा, हीचं काळीज समजून घ्या, मिटूनी खुणवू नका हो, डावा डोळा मिटूनी खुणवू नका हो, फिदीफिदी हसूनी हिणवू नका हो हिणवू...
पुरुषप्रधान संस्कृतीत महीला कलाकाराला मिळणाऱ्या वागणुकीविषयी जगदीश खेबुडकर यांनी लिहिलेल्या ओळी नक्कीच डोळ्यात पाणी आणतात. मात्र महाराष्ट्राची संस्कृती आणि पोटाची खळगी भरण्यासाठी तब्बल ९५ कलाकारांचे पालकत्व स्विकारलेल्या फडाच्या मालकीण सविता राणी पुणेकर आजही पोटासाठी विंचवाचे बिऱ्हाड पाठीवर घेऊन महाराष्ट्रभर फिरत आहेत.


अनेक अडचणींवर मात करत आजही अनेक कलाकारांनी महाराष्ट्राची लोककला जोपासली आहे. करोना कालावधीत उपासमारीची वेळ या कलावंतांवर आली. करोना सारख्या महामारीनंतर महाराष्ट्रासह संपूर्ण देशातील हातावरील पोट असणारी अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली, त्यातच तमाशा कलावंतांची अवस्था अतिशय दयनीय झाली. कोणी मदत केली नाही, उपचारासाठी पैसे नाहीत अशा अनेक अडचणींमध्ये अनेक कलाकार मृत्युमुखी पडले. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाला आणि पुन्हा जगण्याची लढाई सुरू झाली. लावणी शो, डी.जे.च्या तालावार अश्लील नृत्य करणाऱ्या नृत्यांगना यांच्यामुळे महाराष्ट्राची लोककला टिकवून ठेवलेल्या तमाशाला आजही 'अच्छे दिन' आले नाहीत अशी खंत सविता राणी पुणेकर यांनी व्यक्त केली. नांदूरशिंगोटे ता.सिन्नर हे त्यांचे मूळ गाव. १५ पुरुष कलाकार, १५ महिला कलाकार, ६५ कर्मचारी, मालवाहू ३ ट्रक, १ बस, १ जीप असा त्यांचा लवाजमा. जवळपास सर्वच कलाकार नाशिक जिल्ह्यातील विशेषतः सिन्नर तालुक्यातील मिरगाव, सायाळे, नंदूरशिंगोटे गावातील. गणपती विसर्जन झाले की, सराव सुरु होतो तो दसऱ्यापर्यंत. दरवर्षी नवीन गाणी येतात, प्रेक्षक त्याच गाण्यांची फर्माईश करतात त्यामुळे सरावात दरवर्षी नवीन गाणी मुखोदगत करावे लागतात. बाकीचे कर्मचारी वाहने दुरुस्त करणे, तंबू, कनात शिवणे, डागडुजी करणे या कामात व्यस्त होतात. दसऱ्याला तमाशा फड उभा राहतो. मात्र याकाळात यात्रोत्सव नसतात त्यामुळे शिवरात्री पर्यंत तिकीट शो असतो. तिकीट शो ला १०० रुपये तिकीट असते. हजार प्रेक्षक असले तरच परवडते, बऱ्याच ठिकाणी खूप कमी दर्शक असतात मात्र, तरीही कला सादर करावी लागते. शिवरात्री नंतर मात्र गावोगाव यात्रा सुरु होतात त्यामुळे काहीसी आर्थिक आधाराची निश्चिती होते. बऱ्याच ठिकाणी वाईट अनुभव येतात. महिलांना खडे मारणे, गाड्यांच्या काचा फोडणे, स्त्रियांना वाईट इशारे करणे असे वाईट अनुभव येतात.

निफाड तालुक्यातील नारायणटेंबी या गावात आठ दिवसांपूर्वी तिकीट शो असल्याने तंबूसह कार्यक्रमाची संपूर्ण तयारी झाली होती. मात्र आवाज खूप मोठा असल्याची एक नागरिकाने तक्रार केल्यानंतर तमाशा बंद करावा लागला. तेथील सरपंचांनी गैरसोयीबद्दल १० हजार रुपये आर्थिक मदत दिली. त्या शो साठी आम्ही सुरगाणा येथून आलो होतो असे सांगताना त्यांना गहिवरून आले. मात्र सांगवी भुसार ता.कोपरगाव, कळवण सारख्या ठिकाणच्या महिला तमाशातील महिला कलाकारांची ओटीभरण करतात हा आमच्यासाठी नक्कीच सुखद क्षण असतो. सिन्नर तालुक्यातील पंचाळे, धनगरवाडी सारख्या गावात आजही यात्रोत्सवानिमित्त तकतराव वर बसवून तमाशा कलावंतीणीची मिरवणूक काढली जाते. अवकाळी पाऊस आला की, कलाकारांचे खूप हाल होतात. बऱ्याच वेळा सुपारी रद्द करता येत नाही त्यामुळे त्या ही परिस्थितीत कार्यक्रम सादर करावा लागतो. आमची कुटुंबे घरीच असतात. घरी कुणी आजारी पडले किंवा काही कार्यक्रम असला तरच घरी क्वचित जाणे होते. आज आमच्या ज्या हाल अपेष्ठा होत आहेत त्यामुळे मुलांना या क्षेत्रात आणण्याची इच्छा नाही. कलावंताना स्वतःचे घर व जमीन नसल्यामुळे त्यांचे उतार वयात हाल होतात. आम्ही महाराष्ट्राची परंपरा जपत आहोत तरीही नागरिकांचा आमच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन चांगला नाही तो बदलला पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



सरकारने कलावंतांकडे लक्ष द्यावे. कोरोना काळात कलावंतांचे खूप हाल झाले. या काळात नांदूरशिंगोटे गावाने खूप मदत केली त्यावरच आमचा उदर निर्वाह झाला. सरकारकडे आर्थिक मदतीसाठी प्रस्ताव पाठवले मात्र सरकारकडून अद्याप काहीही मदत मिळाली नाही. कलाकार महाराष्ट्रभर फिरत असतात त्यामुळे मुलांच्या शिक्षणाची सोय व्हावी. कर्ज काढून उभ्या केलेल्या फडासाठी आर्थिक अनुदान, व्याजात सवलत मिळावी. – **सविता राणी पुणेकर, फड मालक**

तरुण पिढी तमाशाचा मुख्य आत्मा असलेला वग बघत नाही. गण गौळण झाल्यानंतर तरुण पिढीसाठी ऑर्केस्ट्रा सादर करावा लागतो. त्यातच सरकारने वेळेची मर्यादा ठरवून दिल्याने कला सादर करण्यात अडचणी येत आहेत. आम्हाला कालानुरूप बदल करावा लागत आहे. आगामी काळात तमाशा ही कला जीवंत ठेवण्यासाठी आम्हाला पराकोटीचे प्रयत्न करावे लागणार आहेत त्यासाठी लोकाश्रयासोबतच राजश्रयाची गरज आहे. – **मिथुन भाऊ पुणेकर**




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

' बाप रुखुमादेवीवरे विठ्ठले अर्पिला ' या ओळीत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या आईवडिलांचे नाव मोठ्या सूचकपणे, हृद्य पणे ओवले आहे. ही ओवी गाताना मला माझे आईवडील दिसतात. लहान मुले. घरातील गरीबी, मुलांसाठी खस्ता खाणारे, हताश आईबाप, त्यांच्या निधनानंतरचे अनाथपण .. सारे अनुभव एकसारखे वाटतात.
हे गाणे गाताना सारे एकाकार होते. संपूर्ण निवृत्तीनंतरची ही आलेली उदासीनता संध्याकाळी मनात उतरते. गोरखकल्याण रागाचा आपोआप मारवा होतो ! हा भास आहे, पण तो प्रत्यक्ष आहे. काही संवेदना प्रत्यक्ष असतात हा माझा अनुभव आहे. तो दुसऱ्याला देता येत नाही. आपल्या काव्यातून प्रत्येकाला वेगवेगळा अर्थ शतकानुशतके देणारे कवी म्हणजे साक्षात अनुभवसमृद्ध असे आत्मरूप. त्यांचे हे गीत मला गायला मिळाले हे माझे भाग्यच. असे भाग्य फार थोड्याना लाभते.
' मला वाटतं  या गीताबद्दल दीदींचे हे शब्द पुरेसे बोलके आहेत. मला खात्री आहे की हे वाचल्यानंतर तुम्ही दीदींच्या स्वरातील ही स्वर्गीय अनुभूती प्रत्यक्ष घेतल्याशिवाय राहणार नाही. आणि ते ऐकाच. भक्तिरसाच्या एका परिपूर्ण अनुभवाला सामोरे जा. असाच माऊलींच्या , निवृत्तीनाथांच्या कृपेचा वर्षाव आपल्यावरही व्हावा आणि आपणही नखशिखांत  त्या मोगऱ्याच्या सुगंधात न्हाऊन निघावे हीच त्या विश्वात्मक देवापाशी प्रार्थना...!



# आनंदी पहाट

## जीवनशैलीतील बदलाची आवश्यकता

आधुनिक केसरी

आपल्या कामाची रचना आणि दिनचर्या नसणे हे जीवनात प्रेरणा नसण्याचे एक सामान्य कारण असते. कामाच्या रचना आणि आपल्या दिनचर्या सवयींना घट्ट करण्यास मदत करतात. काहीतरी करण्याची प्रेरणा वाटण्याऐवजी कृती करणे अधिक महत्वाचे असते. डिस्टिमिया हा नैराश्याचा सौम्य परंतू दीर्घकाळ टिकणारा प्रकार आहे. याला पर्सिस्टंट डिप्रेशन डिसऑर्डर असेही म्हणतात. उदासीनतेच्या अधिक तीव्र, क्रॉनिक किंवा आवर्ती भागांनंतर असे बदल घडतात की नाही हे निर्धारित करण्यासाठी भविष्यातील अभ्यास करणे आवश्यक असते. नैराश्य टाळण्यासाठी आणि मानसिक आरोग्यासाठी नियमित व्यायाम करावा, सामाजमाध्यामांच्या वापराचा वेळ कमी करावा, थेट मजबूत सामाजिक संबंध तयार करावेत, आपल्या जीवनशैलीमध्ये बदल करावा, शारीरिक ताण आणि मानसिक तणाव कमी करावा, भरपूर झोप घ्यावी, नकारात्मक विचार, वर्तन असणाऱ्या व्यक्तींपासून दूर राहावे, आळसावर मात करावी, आपले ध्येय व्यवस्थापित करण्यायोग्य बनवावे. अवास्तव उद्दिष्टे विचारात घेणे टाळावे, स्वतःला १०० टक्के परिपूर्ण असण्याची अपेक्षा करू नये, नकारात्मक बोलण्याऐवजी सकारात्मकतेचा वापर करावा, प्रत्येक कामाची कृती योजना तयार करावी, शक्य तितकीच ताकद वापरावी, त्यासाठी आपले कर्तृत्व ओळखावे, मदतीसाठी आप्तेष्टांचा विचार करावा, अंतर्मन विचलित होणे टाळावे. नैराश्याची चार प्रमुख कारणे असतात, ती म्हणजे कौटुंबिक इतिहास, आजार आणि आरोग्य समस्या, औषधे तसेच अल्कोहोल आणि आपले व्यक्तिमत्व होत. शरीरांतर्गत जनुके, मेंदूतील रसायने आणि सभोवतालचे वातावरण यासह अनेक गोष्टी उदासीनता येण्यास कारणीभूत ठरत असतात. अनेकांच्या जीवनातील मोठ्या बदलानंतर किंवा आघातानंतर नैराश्य येण्याची शक्यता असते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655




आधुनिक केसरी

## मुक्तीचे साधन | तुका सांगे ||

हरिनामावीन | नाही रे उध्दार ||
सत्कर्म हे सारं | जीवनाचे ||१||
वासनेचा संग | नको करू मना ||
नरक यातना | भोगीशील ||२||
ठेवावे अखंड | स्वधर्माचे भान ||
तेणे पंचप्राण | मुक्त होती ||३||
लाभला हा जन्म | सत्कार्यी घालावा ||
लडीवाळ व्हावा | ज्ञानाईचा ||४||
सुखाचे संसारी | नामाचे चिंतन ||
मुक्तीचे साधन | तुका सांगे ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८



# हितगुज

पुष्प ३४वे



गुरुमाऊली परमपूज्य अण्णासाहेब मोरे,
दिंडोरी (नाशिक)

## श्रीराम, नाशिक आणि गोदावरी


इतिहास, पुराण, महाकाव्ये या त्रिविध संदर्भांच्या आधारे नाशिकची भूमी प्रभु श्री रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पावन झालेली, त्यांच्या वास्तव्याने निर्मळ बनलेली पवित्र भूमी आहे. दंडकारण्यातील ही देव-निवासाची दिव्य पंचवटी आहे. उत्तर रामचरित्रात या भूमीचे विशेष महत्त्व आहे. भवभूती ने सांगितल्याप्रमाणे लव-कुशास राज्याधिकार सोपविल्यानंतर भगवान श्री रामचंद्र पुन्हा या गोदावरीच्या किनारी येऊन जुन्या स्मृतींना उजाळा देत आपल्या वैयक्तिक जीवनानुभवांचा मानसिक प्रवास करतात. आणि हृदयाच्या कोपर्यात अढळ प्रेमासनावर विराजमान असलेल्या सीतेच्या विरहाने, शोकाने अलोट अश्रूंना वाट करून देतात. साक्षीला असलेल्या गोदावरीने आपल्या उंचबळलेल्या भावाकुल लहरींनी श्रीरामाच्या चरणांना न्हाऊ घालत जणु सांत्वनाचा, धीराचा हात पाठीवरून फिरवलेला असतो. श्रीरामाचे 'मानव' रूप या क्षणी ईश्वर-रूपाशी एकजीव झालेले असते. करुणेच्या प्रत्येक शब्दांच्या आर्द्र भावार्थाने 'उत्तर रामचरित्' लिहिले गेले आहे. नाशिकची पुण्यभूमी अशा अनेकानेक, अध्यात्माच्या अंतरंगात सामावलेली भूमी आहे. 'रामनवमी' आता घरोघरी, मंदिरांमध्ये मोठ्या उत्साहाने संपन्न होणार आहे. या रामभूमीचा तो उत्स्फूर्त, उदात्त असा सोहळा असणार आहे. दशावतारांमध्ये प्रभु रामचंद्रांचे अवतरणे म्हणजे उदात्त अशा संस्कृतीचे, व्यक्तिमत्त्वाचे, धर्माचे, राष्ट्रीयत्वाचे, पराक्रमाचे अवतरणे होय. खरे पाहता अध्यात्म-वैभवाच्या गीतेची सुरुवात श्रीरामापासून होऊन तिला पूर्णत्व श्रीकृष्ण रूपात मिळते. 'माणूस' म्हणून जगण्यासाठी जी उत्तम तत्त्वे, आदर्श, नियम, धारणा आवश्यक असतात, त्यांचे सर्वोत्कृष्ट सामंजस्य म्हणजे श्रीरामाचे जगणे होय. प्रभु श्रीरामाचे जीवन म्हणजे गार्हस्थ्य जीवनाचा शाश्वत, उत्तम आदर्श होय, ज्यात सर्व नाती, संबंध श्रेष्ठत्वाच्या कसोटीवर सार्थक झालेले आहेत. मानवाला 'मानव' म्हणून जगता-जगता 'महान' होता येते, नराचा नारायण बनता येते, याचा विश्वास 'रामायण देते.

**संकलन : बाजीराव सोनवणे, नाशिक**
**संपर्क क्र. ९९२२४२००३४**

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

आप्त अवस्था श्रेष्ठ है, जीवन्मुक्त स्वरुप ।
सहज योग विज्ञान में, महिमा शब्द अनूप
।।४०।।(स्वर्वेद द्वितीय मण्डल अष्टम अध्याय) ०२/०८/४०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सहज योगाद्वारे अनुपम शब्द प्रकाशाची (परब्रह्माचा प्रकाश) प्राप्ती झाल्यावर, पूर्ण निर्भ्रांत ज्ञान प्राप्त होते. हेच जीवन्मुक्तीचे शुद्ध स्वरूप आहे. हीच योगीयांची सर्व श्रेष्ठ आप्त अवस्था आहे. अशाच योगीयांचे वचन शब्द प्रमाण आहेत. यालाच आप्त वचन म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

..............................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निरूपण


आधुनिक केसरी

जेणें अनुभवास ये पूर्ण । वोळखी तापत्रयाची ॥ ३॥
ठेंचा लागती मोडती कांटे । विझती शस्त्रांचे धायटे ।
सला सिलका आणी सरांटे । या नांव आदिभूतिक ॥ ४॥
अंग्या आणी काचकुहिरी । आवचटा लागे शरीरीं ।
गांधील येऊन दंश करी । या नांव आदिभूतिक ॥ ५॥
मासी गोमासी मोहळमासी । मुंगी तेलमुंगी डांस दसी ।

# संतांना कसे ओळखावे ?

आधुनिक केसरी

धान्यामध्ये काही खडे असे असतात की, धान्यापासून ते वेगळे निवडता येत नाहीत. तांदळांत पांढरे खडे असतात, ते निवडू गेले तरी निवडले जात नाहीत. त्याप्रमाणे साधू लोक हे आपल्यात असतात, त्यांना पाहू गेले तर ते आपल्यासारखेच संसारात वावरत असलेले दिसतात; पण खरे पाहता ते आपल्यापेक्षा वेगळे असतात. पुस्तकांतून साधूची लक्षणे पुष्कळ दिलेली असतात. पण त्याप्रमाणे आपण पाहू गेलो तर साधू ओळखता येईलच असे नाही. साधूचे एकच अचूक लक्षण सांगता येईल, ते हे की, जो सर्व ठिकाणी देवाला पाहू शकतो तो साधू. पण एवढ्यावरून आपल्याला तो ओळखता येईल का ?
नाही; तर जेव्हा आपण साधू व्हावे, तेव्हाच आपल्याला साधूला ओळखता येईल.
जगात आपण कुणाचीच निंदा करू नये. आपण जेव्हा दुसऱ्याचे दोष पाहतो, म्हणजेच ते जेव्हा त्याच्याजवळ आहेत असे दिसतात, त्या वेळेस तेच दोष आपल्याजवळ सूक्ष्म रूपाने असतात असे समजावे; आणि आपण लगेच देवाला



शरण जाऊन, 'हे माझे दुर्गुण काढून टाक', म्हणून त्याची करुणा भाकावी, आपण जेव्हा 'जगात न्याय उरला नाही' असे म्हणतो, त्या वेळेस आपल्याजवळ तो दोष आहे समजावे. म्हणून आपण कुणाचे दोष पाहू नयेत. आपण आपल्या स्वतःला आधी सुधारावे. चित्तशुद्धी केल्याशिवाय आपल्या मनात सर्व ठिकाणी भगवद्भाव उत्पन्न होणार नाही. म्हणून जेव्हा जेव्हा आपल्याला दुसऱ्याचे दोष दिसतात, तेव्हा आपलेच चित्त अशुद्ध आहे असे समजून आपण परमात्म्याची करुणा भाकून त्याला शरण जावे, आणि 'माझे चित्त शुद्ध कर' अशी त्याला विनंती करावी. असे केले म्हणजे आपले चित्त शुद्ध होत जाते, आणि मग भगवंताची प्राप्ती व्हायला वेळ लागत नाही.
जे मिश्रण आहे ते पचायला कठीण असते; उदाहरणार्थ, भाजणी. मिश्रण नसलेले एकच शुद्ध अन्न पचायला सोपे असते. हे जसे खरे, त्याचप्रमाणे आपले अंतःकरण अगदी शुद्ध असावे, म्हणजे ते सर्वांमध्ये लवकर मिसळते. पण आपल्या अंतःकरणामध्ये स्वार्थाचे मिश्रण असल्यामुळे ते सर्वांमध्ये समरस होऊ शकत नाही. शुद्ध अंतःकरणाच्या माणसाचे चालणे हळू, आणि बोलणे मृदू असते. तो सर्वांना प्रिय होतो. जगातले आपले समाधान किंवा असमाधान, ज्या वृत्तीने आपण जगाकडे पाहतो त्यावर अवलंबून असते. 'माझ्याकरिता मी नसून, मी लोकांकरिता आहे. माझ्याकरिता जग नसून मी जगाकरिता आहे,' ही वृत्ती आपण ठेवावी. **९४. सर्व चराचर भगवद्रूप जो पाहतो तो साधू.**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
शनिवार, ६ एप्रिल २०२४
adhunikkesari.com

# लोकशाही व संविधानाच्या रक्षणासाठी काँग्रेस कटिबद्ध

## नाना पटोले : सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा संकल्प असलेले काँग्रेसचे 'न्यायपत्र'

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. या जाहीरनाम्याची मध्यवर्ती संकल्पना न्याय ही आहे. मागील १० वर्षांत प्रत्येक घटकाचा न्याय धोक्यात आला आहे, कमकुवत झाला आहे तर काही बाबतीत न्याय नाकारलाही आहे. म्हणूनच काँग्रेस पक्षाने पाच न्याय व २५ गॅरंटी देत देशातील सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा संकल्प असलेले 'न्यायपत्र' जाहीर केले आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.काँग्रेसच्या जाहिरनाम्यावर बोलताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, मागील १० वर्षात नरेंद्र मोदी सरकारच्या काळात शेतकरी, कामगार, तरुण, छोटे व्यापारी या सर्व घटकांना उद्ध्वस्त करण्याचे काम केले आहे. तीन काळे कायदे आणून शेतकऱ्यांना उद्ध्वस्थ करण्याचा प्रयत्न केला, एमएसपीचा कायदा केला नाही. दरवर्षी २ कोटी नोकऱ्या देतो म्हणून तरुणांची फसवणूक केली, महागाई प्रचंड वाढवली, महिला अत्याचारात वाढ झाली. भ्रष्टाचाऱ्यांना साथ देत त्यांनाच सत्तेत सहभागी करुन घेतले. काही मूठभर श्रीमंतांनाच देशाची संपत्ती कशी मिळेल अशीच धोरणे आखली गेली. सर्व यंत्रणांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले आणि हुकूमशाही पद्धतीने कारभार केला. जनतेच्या मागण्या, आशा, अपेक्षा, आकांशा यांच्याकडे जाणीवपूर्क दुर्लक्ष केले परंतु या सर्व समाज घटकांना नाकारलेला न्याय देण्याचा संकल्प काँग्रेस पक्षाने केला आहे. राहुल गांधी यांच्या भारत जोडो



न्याय यात्रेच्या ५ न्याय व २५ गॅरंटीच्या आधारावर हे न्याय पत्र बनवण्यात आले आहे. गरिब महिलांना वर्षाला १ लाख रुपये, पदवीधर, डिप्लोमाधारक सुशिक्षित बेरोजगारांना प्रशिक्षणाबरोबरच वर्षाचे १ लाख रुपये, स्टार्टअपसाठी ५ हजार कोटींचा निधी, ३० लाख सरकारी नोकऱ्यांची भरती, शेतकरी कर्जमाफी, एमएसपीचा कायदा, जीएसटीमुक्त शेती, कामगारांना आयोग्याचे सुरक्षा कवच, ग्रामीण तसेच शहरी भागाच्या विकासावर लक्ष दिले जाणार आहे, अग्निपथ योजना बंद करणार, टोल धोरणाची समिक्षा केली जाईल, जनतेच्या पैशाची लूट थांबवली जाईल. कर दहशतवाद संपवला जाईल, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवली जाईल त्यामुळे मराठा आरक्षणासह इतर समाजातील आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागू शकेल.

देशात अनुसुचित जाती, जमाती व मागास वर्गीयांची ७० टक्के लोकसंख्या आहे, या समाजाला लोकसंख्येच्या प्रमाणात हिस्सेदारी मिळावी यासाठी आर्थिक समाजिक सर्वेक्षण केले जाणार आहे.

महिला, तरुण, कामगार, शेतकरी व हिस्सेदारी न्याय यावर भर दिलेला आहे. डॉ. मनमोहनसिंह यांच्या नेतृत्वाखालील युपीए सरकारने १० वर्षात रोजगार हमी योजना आणून गरिबांच्या हाताला काम दिले, कोणीही उपाशी राहू नये यासाठी अन्न सुरक्षा कायदा आणला. जमीन अधिग्रहण कायदा, शिक्षण हक्क कायदा, माहिती अधिकार कायदा असे सर्वसामान्यांच्या न्याय हक्काचे कायदे आणले होते. मागील १० वर्षात या सर्वांना तिलांजली दिली गेली व मुठभर लोकांसाठी धोरणे राबवली गेली. काँग्रेस सरकार पुन्हा सत्तेत आले तर सर्व समाज घटकांना न्याय मिळेल असे न्यायपत्र जाहीर केले आहे असे पटोले म्हणाले.

# बिबट्याच्या पिलास मिळाले जीवदान

## वनविभागाने नैसर्गिक अधिवासात दिले सोडून

आधुनिक केसरी न्यूज



**वनविगाने केले प्रयत्न :** सदरील आजारी बिबट्याच्या पिलास ऊपचार करण्यासाठी नांदेड येथील उपवनसंरक्षक केशव बाबळे, सहायक ऊपवन संरक्षक बी .एन .ठाकुर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी प्रतिक मोडवान ( भोकर ), वनपरिक्षेत्र अधिकारी बालाजी चव्हाण ( हिमायतनगर ), वनपाल अमोल कदम( हिमायतनगर ),वनपाल ज्ञानेश्वर धोंडगे ( भोकर ), नारायण गीते, सुभाष बालाजी आदिनी शर्थीचे प्रयत्न केले .
**डॉक्टरामुळे मिळालं जीवदान :** नागपूर येथील व्याघ्र व वन्य जीव उपचार केंद्रातील डॉक्टर कूंदन हाते, डॉक्टर सूदर्शन काकडे, डॉक्टर राजेश हूलसूंगे, डॉक्टर पंकज थोरात, डॉक्टर सिध्दांत मोरे याच्या निगराणीत त्या बिबट्याच्या पीलावर तब्बल दोन वर्षे उपचार केल्याने जीवदान मिळाले आहे .

**भोकर :** मागील दोन वर्षांपूर्वी जिरोणा ( ता. हिमायतनगर ) परिसरात शेतकऱ्यास आजारी असलेले बिबट्यांचे पील्लू सापडले. वनविभागानी नागपूर येथे उपचार करून गुरुवारी ता. ( चार ) येथील वनविभागाकडे स्वाधीन केले आहे.मानद जीवरक्षकानी तपासणी केली असता तंदुरुस्त असल्याची खात्री झाल्याने नैसर्गिक आदिवासात सोडून दिले आहे.

वनविभाने दिलेल्या माहितीनुसार, नांदेड जिल्ह्यात बिबट्या जातीचे वन्यजीव आश्रयाला असून त्याचं संरक्षण करण्याची जबाबदारी वनविभागिकडे आहे.

अधूनमधून ते शिकारीसाठी जंगल आणि मानवी वस्तीकडे फिरकतात. मागील दोन वर्षापुर्वी जिरोणा (ता.हिमायतनगर) नियतक्षेत्रवासी परिसरात शेतात कापूस वेचणी करताना एका शेतकऱ्यांला बिबट्या जातीचे दिड वर्ष वयाचे पिल्लू आढळून आल्याने त्यास हिमायतनगर वनविभागाने ७ नोव्हेंबर २०२२ रोजी भोकर वनविभागाकडे पाठवले.सदरील पील्ल्याच्या उजव्या पायास "पॅरिलेसीस आजार झाल्याचे स्पष्ट झाल्याने पुढिल उपचारासाठी नागपूर येथील व्याग्र व वन्य प्राणी उपचार केंद्रात दाखल करण्यात आले आहे. ऊपचारा नंतर तब्बल दोन वर्षांनी गूरूवारी त्या पीलास येथील वनविभागाच्या ताब्यात देण्यात आले.मानद जीवरक्षक आतेंद्र कट्टी यांनी बिबट्याची तपासणी केली असता ते तंदुरुस्त असल्याची खात्री झाल्याने जिरोणा शिवारातील नैसर्गिक अधिवासात सोडून दिले आहे.

# न्यायालयाने सुनावली पतीला 7 वर्षांची शिक्षा

## पत्नीचा छळ केल्याने कंटाळून पत्नीने घेतला गळफास

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** मागील दोन वर्षांपूर्वी पत्नी माहेर असल्याने पतीने सासरवाडीत जावून सासऱ्याला अटो खरेदीसाठी पैशाची मागणी केली त्यास नकार दिल्याने पत्नीचा मानसिक व शारीरिक छळ केल्याने कंटाळून पत्नीने गळफास घेऊन आत्महत्या केली. मरणास कारणीभुत असल्याचे सिद्ध झाल्याने शुक्रवारी ता.( पाच ) येथील अतिरीक्त जिल्हा सत्र न्यायाधीश श्रेणी१चे वाय.एम.एच.खरादी यांनी अरोपीस सात वर्षाची शिक्षा सुनावली आहे. येथील न्यायालयाने दिलेल्या माहितीनुसार,महमदी रा.मुदखेड हिचा विवाह भोसी ( ता.भोकर ) येथील सलीम जमालसाहब पिंजारी समवेत झाला होता.पत्नी महमदी आपल्या माहेरी मूदखेड येथे गेल्यावर ता.२६ नोव्हेंबर २०२२ रोजी पती सलीम यांनी सासरवाडीत जाऊन सास-यास मला अटो खरेदीसाठी पन्नास हजार रुपये पाहिजे अशी मागणी केली.माझ्याकडे सध्या पैसे नाहीत असे सास-यानी सांगितले असता सलीम यांनी पत्नी महमदी हीस भोसी येथे घेऊन जातो असे सांगितले. यावेळी सासऱ्यांनी व सासूनी विरोध केला होता. त्यास न जुमानता पत्नी व मुलास भोसी येथे घेवून गेला. भोसी येथे घरी गेल्यावर पुन्हा पैशासाठी मानसिक व शारीरिक छळ करीत ऊपासपोटी ठेवून अपमानित केले.अपमान सहन न झाल्याने महमदीने घरातील टिन पत्राच्या लाकडाला काळ्या ओढणीने गळफास घेऊन आत्महत्या केली.भोकर पोलिस कार्यालयात बिस्मिल्ला बी शादूल्ला ( वय ६० ) राहणार मराठगल्ली मूदखेड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अरोपी सलीम जमालसाब पिंजारी ( वय. ३२ ) राहणार भोसी ( ता.भोकर ) याचे विरूध्द गून्हा दाखल करण्यात आला आहे. सदर प्रकरणी पोलिसांनी केलेला तपास व येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालयातील सरकारी वकीलाने साक्षीच्या आधारे लेखी युक्तिवाद सादर केल्याने न्यायधिश वाय.एम.एच.खरादि यांनी आरोपी सलीम यास सात वर्षाची शिक्षा दहा हजार रुपये दंड व दंड न भरल्यास अतिरिक्त वाढीव शिक्षा सुनावली आहे. सदरील प्रकरणी अतिरिक्त सरकारी अभियोक्ता सौ.अनूसया रेड्डी ( डावकरे ) यांनी काम पाहिले. पैरवी अधिकारी फेरोज खान पठाण,लिपीक मारोती अटकोरे, पोलीस उपनिरीक्षक सुर्यकांत कांबळे यांनी सहकार्य केले आहे.



# संजय कोकाटे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात पक्ष प्रवेश

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह पक्षप्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना शिंदे गटाचे माढा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये आज राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत प्रदेश कार्यालयामध्ये शिवसेना शिंदे गटाचे माढा संपर्कप्रमुख संजय कोकाटे, शिवसेना शिंदे गटाचे विधानसभा प्रमुख रामचंद्र टकले, शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर जिल्हा उपप्रमुख विनोद पाटील, सुभाष पाटील - सरपंच, आहेरगाव, ता. टेभूर्णी, सुनिल गव्हणे विद्यार्थी संघटना, पंढरपूर , इत्यादींचा पक्षप्रवेश झाला आहे. यावेळी संजय कोकाटे संजय पाटील घाटणेकर, अभिजीत पाटील, बळिरामकाका साठे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

पक्षप्रवेशादरम्यान मार्गदर्शन करताना जयंत पाटील म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष मधल्या काळामध्ये संकटात होता परंतु आता हळूहळू तिकडचे अनुभव येत असल्याने पुन्हा लोक पक्षाशी जुळत आहे असे जयंत पाटील म्हणाले.

जयंत पाटील म्हणाले की, महाराष्ट्रातील सामान्य माणसाला राज्यातील जी परिस्थिती आहे त्या संदर्भात प्रचंड राग आणि असंतोष सामान्य माणसांमध्ये आहे. कशा प्रकारे सत्ता टिकवण्याचे सुरू आहे हे आपण आज बघत आहे. सत्तेचा गैरवापर करून दबाव टाकून पक्षात घेण्याचे काम सुरू आहे. १९ मधील निवडणुकीमध्ये देखील असेच सुरू होते त्यावेळेस देखील मी सांगितलं होतं की यांना जर तिकडे याचाच अर्थात तिकडे परिस्थिती चांगली नाही आहे. या निवडणुकीमध्ये महागाईला कंटाळलेल्या जनतेने, बेरोजगार असलेल्या युवकांनी, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही हे सर्व कधी निवडणूक लागते याची वाट बघत होते. असेही जयंत पाटील म्हणाले.

पुढे जयंत पाटील म्हणाले की, आमच्याकडे सर्वसामान्य कार्यकर्ते आहेत. तर दुसऱ्या बाजूला सत्तारूढ पक्षाकडे कॉन्टॅक्टर आहे. आमच्या पक्षात एखाद्या व्यक्तींनी प्रवेश केला तर त्यांच्या मागे तपास यंत्रणेच्या माध्यमातून कारवाई करण्यात येते. निवडणुका जर जाहीर झाल्यास तपास यंत्रणेने आपलं काम थांबवलं पाहिजेत. एखादा पक्षाचा कार्यकर्ता उमेदवार म्हणून जर रिंगणात असेल तर त्या नेत्यांवर तुम्ही कारवाई करत आहात याचा अर्थ तुम्ही लोकशाही विरोधात आहात असा अर्थ देशातील जनता काढू शकते. असेही जयंत पाटील यांनी म्हटले आहे.

जयंत पाटील म्हणाले की, भाजपला ४०० खासदार निवडून आणायचे आहे ते याकरिता की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान बदलण्याकरिता यांना खासदार निवडून आणायचे आहे. या देशातील घटना बदलून सर्व अधिकार आपल्याकडे आणण्यासाठी हा प्रयत्न सुरू आहे. देशामध्ये लोकशाही टिकवायची की नाही त्या दृष्टीने ही लोकसभा निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे आणि हे सर्व तुम्हा आम्हाला ठरवायचं आहे असे जयंत पाटील म्हणाले.

जयंत पाटील म्हणाले की, संजू भाऊ कोकाटे तुम्ही योग्य पाऊल टाकलेला आहे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात मी तुमच स्वागत करतो माढ्यामध्ये पक्ष संघटना बळकट केली तर तिथे तुमच्या शिव्या दुसरं कोणी नाही. पक्ष संघटना बूत पर्यंत पोहोचवली तर तुमचा सूर्य तुतारीच्या नावाने उगेल त्यामुळे माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे की ताकदीने काम करा असेही जयंत पाटील म्हणाले.

# जशास तसे प्रत्युत्तर देऊ

आधुनिक केसरी

पाकिस्तानमधून भारताविरोधात होणाऱ्या दहशतवादी कारवायांचा सामना भारत
अनेक वर्षांपासून करत आहे. अलीकडच्या काळात भारताच्या संरक्षण यंत्रणांनी पाकिस्तानमधील दहशतवादी संघटनांना वेसण घातली आहे. यावर भारताचे संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी भाष्य केले आहे. भारतात दहशतवादी कारवाया करून कोणी पाकिस्तानात पळून गेला तर आम्ही त्याला पाकिस्तानात घुसून मारू. नेटवर्क १८ ला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. राजनाथ सिंह म्हणाले, आमच्या शेजारच्या देशातून आपल्या देशात दहशतवादी कारवाया होत असतील, आपल्या देशाची शांतता भंग करण्याचा प्रयत्न होत असेल तर आम्ही त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देऊ. मुलाखतकार म्हणाले, अमेरिकेतील गार्डियन नावाच्या एका प्रकाशनाने भारत आणि पाकिस्तानविषयी एक लेख प्रसिद्ध केला आहे. या लेखात दावा करण्यात आला आहे की, भारताने अलीकडच्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानमध्ये काही कारवाया करून २० हून अधिक लोकांना मारले आहे. भारत केजीबी (रशियाची गुप्तचर यंत्रणा) आणि मोसादप्रमाणे काम करतोय. याबाबत तुम्ही काय सांगाल? या प्रश्नावर राजनाथ सिंह म्हणाले, कोणीही आमच्या देशाची शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्यांना जशास तसे प्रत्युत्तर देऊ. कोणी भारतात दहशतवादी कारवाया केल्या आणि पळून पाकिस्तानला गेला तर आम्ही त्याला पाकिस्तानमध्ये घुसून मारू. राजनाथ सिंह म्हणाले, भारताची ताकद किती आहे हे आता पाकिस्तानलाही समजले आहे. भारत शक्तीशाली आहे. त्याचबरोबर भारत आपल्या शेजाऱ्यांबरोबर चांगले संबंध ठेवण्याचा प्रयत्न करतोय. तुम्ही इतिहासाची पानं चाळून पाहा, तुम्हाला कळेल की आजतागायत भारताने कुठल्याही देशावर आक्रमण केलेलं नाही, अथवा तसा कधी प्रयत्नदेखील केलेला नाही. भारताने जगातल्या कोणत्याही देशाच्या एक इंच जमिनीवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला नाही. परंतु, भारताकडे कोणी डोळे वटारले, भारतात दहशतवादी कारवाया केल्या तर त्यांची काही खैर नाही. पूर्व लडाखमध्ये चीनबरोबरचा सुमारे चार वर्षांचा सीमावाद आणि हिंदी महासागरात चिनी सैन्याच्या प्रवेशाबाबतच्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर काही दिवसापूर्वी राजनाथ सिंह यांनी भाष्य केले होते. तेव्हा राजनाथ सिंह म्हणाले होते, भारतावर कोणी वाईट नजर टाकल्यास, भारतीय सेना चोख प्रत्युत्तर देण्यासाठी सुसज्ज, सक्षम आणि तयार आहेत. संरक्षणमंत्री एका संरक्षण परिषदेत ते बोलत होते.

# शोषणकर्त्यांपासून सावधान



प्रा.बरसमवाड विठ्ठल
गोकुळवाडी. ता. मुखेड

आधुनिक केसरी

**देशातील अनेक हुकूमशहा सर्व सामान्य लोकांचे पूर्वी शोषण करीत होते. फ्रान्स मध्ये सोळावा लूई हा तिसऱ्या वर्गावर कर लादत असे. म्हणून 1789 मध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडवून आली. या क्रांतीने जगाला स्वातंत्र्य, समता, बंधूता ही तीन तत्वे दिली. अमेरिकेने आपल्या वसाहतीवर कर लागले, त्यामुळे समाजामध्ये रोष निर्माण होऊन अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध पेटले. इटलीमध्ये मुसोलिनी आणि जर्मनीमध्ये हिटलर यांनी जनतेला हलाखीचे जीवन जगण्यास भाग पाडले. वतनदार,उमराव- सरदार, जहागीरदार यांनी स्वतःच्या प्रतिष्ठेसाठी तिसऱ्या श्रेणीतील लोकांचे शोषण केले. आज सुद्धा आपल्या देशात मोठे मासे छोट्या माशांना खात आहेत.**

अनेक पिढ्यांपासून घराणेशाही चालू आहे. कोणतेही पद, प्रतिष्ठा, मानसन्मान आपल्या कडेच राहावे असे अनेकांना वाटत आहे. आपल्याला मिळालेली सत्ताही आपल्या पराक्रमाने मिळाली, आपल्या चांगल्या वागण्यामुळे मिळाली असा काही जणांचा गोड गैरसमज झालेला आहे. सत्ता संपत्तीच्या हव्यासापोटी अनेक जण दुबळ्या लोकांना त्रास देऊन वाद करीत आहेत. त्यामुळे कोणत्याही थराला जाऊन शोषण करत आहेत. साम ,दाम ,दंड ,भेद ही चाणक्य नीती वापरून आपला हव्यास पूर्ण करत आहेत. सगळी संपत्ती माझीच आहे, मीच सर्वश्रेष्ठ आहे या नादामध्येच इतरांना मागे टाकत द्वेष निर्माण करीत आहेत. त्यामुळे गरिबांचे, पीडितांचे, अनाथांचे, दीन दुबळ्यांचे, कमजोर लोकांचे, दलिताचे शोषण सतत होत आहे. हे कधी थांबणार ?. इतरांचे शोषण करून इमल्यावर इमले चढवत आहेत. गुंडशाही फोफावली आहे. दोन-चार वर्षात मालक , सेठ होत आहेत. पतसंस्था काढून सोने गहान ठेवून वेगळ्या पद्धतीने गोरख धंदा सुरू केला आहे. शोषणाचे वेगवेगळे प्रकार आहेत. व्याजाने पैसा देण्यापेक्षा पतसंस्थेच्या माध्यमातून द्यावा, असा सुद्धा एक चतुर वर्ग तयार झाला आहे .खरोखर असणारी गरज वेगळी आणि जाहिराती दाखवून खोटे -नाटे दाखवून शोषण केले जात आहे. बाप ना भैय्या LL सबसे बडा रुपयाLL असं म्हटलं जाते, म्हणून आज समाजात दोन वर्ग आहेत. 1) आहे रे ,2) नाही रे .नाही रे वर्गाकडे काहीच नाही. आहे रे वर्गाकडे भरपूर संपत्ती ,जमीन जुमला,सोने-नाणे आहे .
नाही रे वर्ग संघर्षातूनच जीवन जगत आहे ,वर्गसंघर्षामधून सर्वसामान्य कामगार, जनता, दीन दलित- पीडित यांना त्रास सहन करावा लागतो. ज्यांच्याकडे सत्ता ,संपत्ती ,भांडवल आहे ते आज नोटा उधळत आहेत. करोडो रुपये कार्यक्रमावर खर्च करत आहेत. हा सगळा पैसा जनतेचा आहे माणसाची श्रीमंती किती असावी याला काहीही माप नाही. आज काही लोक एक वेळेच्या जेवणा साठी शिवभोजन थाळी खाऊन उदर निर्वाह करत आहेत .तर काही जणांच्या घरी अन्न दररोज वाया जात आहे. काही कामगार आयुष्य भर काम केले, तरीही त्यांना दोन वेळेची भाकरी व्यवस्थित मिळाली नाही. गोरगरीब जनतेला जीवनामधून आनंद शोधण्यासाठी त्यांना घर बांधता बांधता जीवन संपले. म्हणून शोषण होऊ नये,शिक्षण शिकावे, त्यामुळे समाज सुधारकांनी यांच्या पाठीशी उभे राहिले. एका माणसा कडे एक माणूस शोषित म्हणून पाहतो तर दुसरा माणूस त्याच माणसाला जीवनमूल्ये शिकवतो.यात विरोधाभास आहे. माणसं उभं करण्यासाठी अनेक वर्षे लागतात ; परंतु वाईट काम करण्या साठी काही वेळ लागत नाही. गरिबांनी शिकावं, चारचौघात बसावं त्यांचं पोषण व्हावं म्हणून चांगले कर्म



करणारे अनेक आहेत आणि त्यांच्या वरच कुरघोडी करून खाणारे हुकूमशाह वेगळे आहेत. हे कधी थांबेल? म्हणून शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. दिवसाढवळ्या खून होत आहेत. अन्याय ,अत्याचार, बलात्कार केले जात आहे. तरी मोकाट पोरं बाहेर फिरत आहेत . मोठ्या व्यक्तीचा फोन आला की आरोपीना सोडून द्यावे लागते. आणि गरीब पीडित, लोक वर्षानुवर्ष तुरुंगात बसून खडे फोडत आहेत. श्रीमंत लोकांच्या मुलांनी गरीब लोकांवर अन्याय करणे, जणू काही हा पायंडा पडला आहे.हे शोषण कधी थांबणार ? देशाला स्वातंत्र्य म्हणून 75 वर्षे पूर्ण झाले आहेत, तरी भ्रष्टाचार वाढतच आहे. तो आता शिष्टाचार बनून वागत आहे ,वर्षानुवर्षे काही लोक पद उपभोगत आहेत. शोषणामागून शोषण केले जात आहे. खरे बोलणा-याचा सूड घेतला जात आहे. कानावर हात ठेवा, तोंडावर हात ठेवा, बोलू नका? गुपचूप रहा, असा अप्रत्यक्ष धमकी वजा संदेश दिला जातो, आणि आपल्या मना सारखे कार्य करून घेतले जाते. महिलांचे शोषण हा एक गंभीर विषय आहे. वरिष्ठांकडून महिलांचे शोषण केले जात आहे. वर्षानुवर्षे जर शोषण होत असेल तर आपण गप्प बसू नये. संविधानने शोषणाविरुद्ध हक्कातून पिळूणुकीच्या किंवा सर्व प्रकारावर बंदी घातली आहे ,बालकाचे शोषण थांबवण्यासाठी विशेष तरतूद आहे. ज्या मुला -मुलीचे वय 14 वर्षाखालील आहे. त्यांना धोक्याच्या ठिकाणी काम देऊ नये, असे सांगितले आहे. कारखाने, खाणी यासारख्या ठिकाणी छोट्या मुलांची मुलींची नियुक्ती करू नये. त्यांना कामे देऊ नयेत. वेठबिगारी म्हणजे एखाद्या व्यक्तीला पैसे न देता काम करून घेणे .त्याला गुलामासारखे वागवणे, उपासमार करणे, जुलूम जबरदस्ती करणे हे शोषणाचे प्रकार आहेत. तुमचे शोषण कोणी करू नये, तुमचे स्वातंत्र्य तुम्हाला उपभोक्ता यावे, म्हणून घटनेने अनेक कायदे केलेले आहेत. त्याच्याविषयी तुमच्यामध्ये जागृती असावी ते तुम्हाला माहीत असावेत. सर्व स्त्री-पुरुषांना किमान वेतन कायदा तसेच सर्वांना कामाचे तास सारखेच असावेत .विश्रांतीच्या वेळा सुद्धा बरोबर असाव्यात. म्हणून तुमचे शोषण कोणालाही करू देऊ नका. हे जीवन आनंदी जगा. पूर्वीच्या काळी लोक निरक्षर होते. कोणत्याही कागदपत्रावर अंगठा घेऊन राजरोसपणे लोकांच्या जमिनी हडपल्या जात होत्या. रात्रंदिवस काम करून सुद्धा पैसे हातात वेळेवर मिळत नव्हते. जमीनदार, बागायतदार यांनी कामगारांचे बऱ्याच ठिकाणी अतोनात छळ केलेले आहेत.कामगारांना इजा पोहोचल्यास पैसे न देणे, तसेच एकसारखे काम न लावणे ,कामात खंड पाडणे, मजुरी न वाढवणे असे करून कामगारांचे शोषण केले. आजही अप्रत्यक्ष काही चतुर लोक कामगारांचा छळ करतात.मुकादम हे लोकांना काही ठिकाणी फसवितात. त्यामुळे सावध रहा,घामाच्या धारा गाळून पैसे इतरांना देऊन तुम्ही कंगाल होऊ नका. कामगार कायद्याचे पुस्तक वाचा. त्यावेळेस तुम्हाला ज्ञान मिळेल. अगोदर कामगारांना रविवारची सुट्टी नव्हती ,कामगारांनी एकत्रित येऊन लढा उभारला. तेव्हा रविवारची हक्काची सुट्टी मिळाली त्यामुळे शोषण कमी झाले. काही लोक इतरांचे अपहरण करतात ,छोट्या मुलांना त्रास देणे ,त्यांना भीक मागण्यास प्रवृत्त करणे .अशा सुद्धा काही टोळ्या आपल्या देशात तयार झालेल्या आहेत त्यासाठी आपण सतर्क रहावे. एखादी शासकीय ,निमशासकीय नोकरी लावून देतो म्हणून लाखो रुपये गरीब लोकांकडून घेऊन सतत त्यांना ताटकळत ठेवत आहेत. तारुण्यांची दहा-पंधरा वर्षे संपून गेल्यानंतर त्यांच्या लक्षात येते की आपले शोषण केले गेले. एका बाजूला आपण स्वातंत्र्य असून पारतंत्रात राहिल्या सारखे होते. मोठमोठ्या कंपनीमध्ये पॅकेजच्या गोंडस नावाखाली अनेक तरुण-तरुणीला फसविले जात आहे. प्रत्यक्ष हातामध्ये ज्यावेळेस पगार येतो. त्यावेळेस पॅकेजचे खरे रूप आपल्यासमोर येते म्हणून कोणाकडूनही तुम्ही फसविले जाऊ नका. शहानिशा करून योग्य निर्णय घ्या. जास्त त्रास होत असेल तर लोकशाहीच्या चौथ्या खांबास भेटून आपले गाऱ्हाणे सडेतोडपणे मांडा. योग्य न्याय मिळेल. एवढेच सांगणे.

# आदेश पालन सिद्धांत पद्धती संपुष्टात आल्याने कौटुंबिक कलहात वाढ



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**सध्या सगळीकडेच कौटुंबिक कलह चरणसिमेवर आहेत. याच कारण देखिल तसंच रंजक आहे.एक काळ असा होता कि कुटुबांत कलह आहे अस कुटुंब शोधुन देखिल सापडत नव्हतं. आज काळ बदलला आहे त्यामुळे कलह नाही असं कुटुंब अस्तित्वात नाही. सगळीकडे कलहच कलह आहे मग नांत कोणतहीअसो, आई वडील, पती, पत्नी मुलं, भाऊ, भाऊ, बहीण भाऊ, कोणाचेही विचार कोणाशी जुळायला तयार नाहीत. याचे परिणाम स्वरूप कलह वाढीस लागले मग नेमकं कसं असं काय बदल झाला कि एवढी बिकट परिस्थिती निर्माण झाली आहे. साधारणतःसिद्धांत म्हणजे काय तर एखादया विषयातील अथवा विषया संदर्भातील अलिखित नियम ज्यांचं पालन लिखित आदेशापेक्षाही काटेकोर पणे इमानेइतबारे होईल असा आदेश पालन हाच आदेश पालन सिद्धांत पद्धती हि जो पर्यंत भारतीय समाज व्यवस्थेत रूढ अस्तित्वात होती.**

तो पर्यंत कुटुंब संस्था ही प्रचंड प्रमाणात मजबूत होती.आज प्रत्येकाला आदेश देण्याची इच्छा निर्माण झाली आहे.पण आदेश पालन करण्यासाठी कोणीही तयार नाही.आदेश पालन सिद्धांत हि पद्धत संपुष्टात आल्याने आदेश पालन करण्यासाठी कोणीही तयार असल्याचं आढळतं नाही.त्याचे विपरीत परीणाम म्हणून कुटुंब संस्था खिळखिळ होऊन मोडकळीस आली आहे.आज कुटुंब हे फक्त नावाला शिल्लक रहिल आहे. प्रत्येकाला स्वतःच स्वतंत्र अस्तित्व अपेक्षित असल्याने कुटुंबांची व्याख्या दिवसेंदिवस लहान होत चालली आहे. त्या काळी कुटुंब प्रमुख व्यक्ती हाच एकमेव प्रमुख असल्याने कुटुंबातील सर्व सदस्य हे बिनबोभाट पणे आदेशाच पालन करत. कुटुंब प्रमुख यांच्या तोंडातून जो शब्द निघाला तो कायदा असल्या सारखा असायचा. त्या शब्दांना आदेशाला कोणीही कुटुंबातील सदस्य विरोध दर्शवत नसत. सर्वांची मुक संमती मिळत असे इच्छा आसो वा नसो आदेश पालन करणं क्रमप्राप्त होतं.आदेश पालन सिद्धांत पद्धती चा फायदा हाच होता कि कुटुंब मजबुत सशक्त आणि अज्ञाधारक होत . कौटुंबिक कलह हा विषय अस्तित्वात नव्हताच.आई वडील मुलं आजी आजोबा चुलते मालते चुलत बहीण भाऊ असं भल मोठं दांडग कुटुंब असलं तरीही एकाच व्यक्तिचा आदेश अंतिम असायचा तो आदेश सिद्धांत समजुन लक्ष्मण रेषा म्हणून त्याचं कोणीही उल्लंघन करत नसे . म्हणुन कुटुंब हे मजबूत आणि कलहविरहीत असायचं. आज काय स्थिती आहे तर मुलं आई वडीलांच्या आज्ञेत नाहीत. कोणीच कोणाच ऐकायला तयार नाही. प्रत्येकाला आपल्या स्वतःच्या सद्सद्विवेक बुद्धी नुसार आपल् स्वतःच आयुष्य जगण्यात स्वारस्य आहे. मग सिद्धांत,शब्द,प्रमाण हे सगळं कालबाह्य झाल आहे.आई वडील,मुलं पती पत्नी प्रत्येकाला मत आहे.प्रत्येकाची भुमिका आहे.आपण स्वतः ज्ञानी आहेत हा प्रत्येकाचा समज आहे.मग आपण ज्ञानी आपल्याला समजतं तर दुसर्याच कशासाठी ऐकायचं म्हणजे आदेश वगैरे सिद्धांत पालन हि काहिच गरज नाही असं प्रत्येकाचं मत झालंय त्या मुळे आदेश पालन सिद्धांत पद्धती कालबाह्य झाली. कदाचित हि पद्धत उपयोगी नाही असं तंत्रज्ञान युगातील पिढीला वाटत असेलही म्हणून हि पद्धत बंद झाली. आदेश पालन सिद्धांत पद्धती संपुष्टात येण व कौटुंबिक कलह निर्माण होण्यास आरंभ होण ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. आजही कुटुंब प्रमुखाचा आदेश पालन सिद्धांत पद्धती पुन्हा चालू झाली तर कौटुंबिक कलह संपुष्टात आल्याशिवाय राहणार नाहीत.आजही फक्त तो मुळ विचार सिद्धांत स्वीकारायचा आहे. जो आपल्या कुटुंबाच्या समाजाच्या राष्ट्राच्या हितासाठी लाभादयी ठरेल. आपण तो मुळ विचार आणि आपल्या संसकृतीचा पाया बाजुला सोडला म्हणून हि दयनीय अवस्था आपल्याला विद्यमान स्थितीत पाह्यला मिळत आहे.आपले विचार ज्ञान हुशारी प्रचंड आहे पण ती कोणाच्या तरी अज्ञेत असल्याशिवाय लाभादायी ठरणार नाही. हेच विचार आत्मसात करुन अंमलात आणण्याची गरज आहे.जेणेकरून पुन्हा किमान सध्याचं छोटेखानी कुटुंब तरी कलह मुक्त होईल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. कार्यकारी संपादक - बाजीराव श्रीराम खांदवे, अहमदनगर कार्यालय - तिसरा मजला, खरेदी विक्री संघाची जुनी इमारत, मार्केट यार्ड, स्टेशन रोड, अहमदनगर ४१४००१, फोन ९८२२१०७६५०. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * Executive Editor - Bajirao Shriram Khandave. Ahmednagar office - third floor, kharedi - vikri sangh old building, Market yard Station Road, Ahmednagar 414001. Phone 9822107650.(* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739





# वरोड्याच्या एस ए योगा इन्स्टिट्यूटने आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळवली 16 सुवर्णपदके; वरोडवासीयांनी केले दमदार स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** बँकॉक येथे नुकताच पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय योग स्पर्धेत चंद्रपूर जिल्ह्यातील वरोडा येथील एस. ए. योगा इन्स्टिट्यूटच्या आठ योगापटूंच्या चमुने तब्बल 13 सुवर्णपदकासह तीन रौप्य पदक पटकावत आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या योग कलेचे उत्तम सादरीकरण करीत देशाला 13 सुवर्ण पदक मिळवून दिले आहे. स्वप्निल पोहनकर व अनिकेत ठग या दोन उच्चविद्याविभूषित तरुणांनी वरोडा सारख्या तालुक्यामध्ये एस ए योगा इन्स्टिट्यूट च्या माध्यमातून योगा चा प्रचार व प्रसार करण्याचे काम सुरू केलेले आहे . वरोडा वासियांनी आपल्या पाल्यांना सर्वांगीण विकासाकरिता योगा इन्स्टिट्यूट मध्ये पाठविले असून स्वप्निलपोहनकर व अनिकेत ठग हे दोन्ही तरुण या विद्यार्थ्यांना योगासनाचे धडे देत आहेत. नुकतीच बँकॉक येथे आंतरराष्ट्रीय योग स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत 13 देशांच्या 127 योगपटूननी सहभाग घेतला होता. यात वरोडाच्या आठ योगपटूंचा सहभाग होता. या आठ योगपटूंनी 13 देशांच्या 127 स्पर्धांकामध्ये तब्बल 13 सुवर्णपदक व तीन रौप्य पदक पटकावत भारताचा झेंडा आंतरराष्ट्रीय पातळीवर रोवण्यात मोलाचे योगदान दिलेले आहे. बँकॉक येथून वरोडा येथे परतल्यानंतर या योगपटूंचे वरोडावासी यांनी दमदार स्वागत केले. ढोल ताशांच्या गजरामध्ये त्यांच्या गळ्यात पुष्पहार अर्पण करीत त्यांच्या भावी वाटचाली करता त्यांना शुभेच्छा दिल्या.

**आंतरराष्ट्रीय पातळीवर धडक देणाऱ्या योगपटूंमध्ये मुलांमध्ये**
1) शौनक आमटे – 2 सुवर्ण, 2) साहिल खापणे– 2 सुवर्ण, 3) श्रीकांत घानवडे– 1 सुवर्ण;1 रौप्य, 4) राम झाडे– 2 सुवर्ण, 1) सई नेवास्कर–1 सुवर्ण, 1 रौप्य, 2) स्वर्निका नौकरकर–2 सुवर्ण, 3) शर्वरी मिटकर–2 सुवर्ण, 4) गायत्री पाल– 1 सुवर्ण, 1 रौप्य . अशी दमदार कामगिरी केली आहे . वरोडा सारख्या तालुक्याच्या ठिकाणी सुरु असलेल्या योगाचा प्रचार व प्रसार आणि त्यातून वरोडा तालुक्यातील योगपटूंनी आंतरराष्ट्रीय पातळीवर मिळवलेल्या या यशामुळे त्यांच्यावर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव करण्यात येत आहे .

# खा. सुभाष भामरे, लोजपाचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांच्यात आगामी लोकसभा निवडणुकीबाबत चर्चा

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लोक जनशक्ती रामविलास पक्षाचे अध्यक्ष चिराग पासवान हे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'एनडीए'मध्ये सामील झाले आहेत. त्या अनुषंगाने बिहार राज्यात महायुतींमधून लोक जनशक्ती पार्टीचे पाच उमेदवारांना लोकसभेसाठी उमेदवारी देण्यात आली आहे. आगामी पहिल्या टप्प्यातील लोकसभा प्रचाराची सुरुवात आज लोक जनशक्ती रामविलास पार्टीचे अधिकृत उमेदवार अरुण भारती यांच्या जमुई लोकसभा क्षेत्रातून देशाचे प्रधानमंत्री तथा भाजपाचे नेते नरेंद्र मोदी यांनी प्रचार केला आहे. त्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष शमीम भाई हवा व महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष विनय गायकवाड यांच्या आदेशान्वये आज धुळे लोकसभा मतदारसंघातील एनडीए व भाजपाचे विद्यमान खासदार तथा आगामी लोकसभा निवडणुकीचे अधिकृत उमेदवार डॉक्टर सुभाष भामरे यांच्याशी आज एनडीए घटकातील लोक जनशक्ती रामविलास पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे , महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शोभाताई चव्हाण, जिल्हा महासचिव कुंदन खरात, मधुकर चव्हाण, यांसह आधी पदाधिकाऱ्यांनी आगामी निवडणुकी संदर्भात दिलखुलास चर्चा केली आहे.खासदार डॉक्टर सुभाष भामरे यांनी एका कार्यक्रमाप्रसंगी जात असताना लोक जनशक्ती पार्टीचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष दिलीप आप्पा साळवे यांची भेट घेऊन चर्चा केली आहे.यावेळी लोक जनशक्ती रामविलास पार्टीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# सुमित पंडित यांना राष्ट्रीय कला गौरव पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** समाजसेवक सुमित पंडित यांच्या सामाजिक



कार्याची दखल घेत ते करीत असलेल्या रजंल्या गांजल्याची सेवा खरचं समाजापुढे वाखाडण्याजोगी आहे, रस्तावर फिरणाऱ्या मनोरुग्णांची दाढी केस कापून स्वच्छ अंघोळ घालुन त्यांना मनोविकृती रुग्णालयात कागदोपत्री पुर्तता करुन उपचारासाठी दाखल करतात, शासकीय रुग्णालयात गरजु रुग्णांना अर्ध्या रात्री मेडिकल साहित्य, भोजन, रक्त, पुरविण्यात ही जोडी देवदुतासारखी मदतीला धावुन जाते,बेवारसांचे अत्यंविधी सुध्दा हे दापत्य माणुसकी समुहाच्या माध्यमातून करतात, सुमित यांची पत्नी पुजा पंडीत सध्या संभाजीनगर (औरंगाबाद) येथे रोडवरील बेवारस अवस्थेत सापडलेल्या वृध्दाचा वृध्दाश्रमात सांभाळ करते, जटवाडा रोड येथे माणुसकी वृध्द सेवालय देखील वृध्दाच्या सेवेसाठी मदतकार्य करते, म्हणूनच त्याच्या या सामाजिक कार्याची दखल घेत,त्यांना सन्मानित करण्यात येणार आहे, सर्व मान्मानिय सत्कार मुर्ती ना कळवण्यात आनंद होत आहे. बुलढाणा फिल्म सोसायटी यांच्या वतीने विवीध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार सोहळा आयोजित केला आहे, हा सोहळा पत्रकार भवन बुलढाणा येथे दिनांक ७-४-२०२४ रोजी आयोजीत करण्यात आला आहे, या कार्यक्रमाचे आयोजक सुरज भास्कर वाडेकर यांनी पुरस्कार जाहीर झाल्याचे निवड समितीतर्फे पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.या आधी सुमित पंडित यांना विविध ९७ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे त्यांचा हा ९८ वा पुरस्कार जाहीर झाला आहे.
ह्या पुरस्कारामुळे समाजात समाजसेवक सुमित पंडीत यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# प्रा. नंदकिशोर टेकाळे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

आधुनिक केसरी न्यूज




**कळंब :** शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचे प्राध्यापक म्हणून ३३ वर्षे प्रदीर्घ अशी सेवा केल्यानंतर आज दि.३० मार्च २०२३ रोजी हे आपल्या सेवेतून सेवानिवृत्त झाले. ज्ञान प्रसारक मंडळ सचिव डॉ. अशोकराव मोहेकर, प्रा. अंजली मोहेकर, डॉ. सुनील पवार, प्रा.जनक टेकाळे उपस्थित होते. सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते पूज्य ज्ञानदेव मोहेकर गुरूजी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांच्या या सेवानिवृत्तीनिमित्त कार्यक्रमांमध्ये त्यांच्याबद्दल मराठी विभाग प्रमुख डॉ. दादाराव गुंडरे, डॉ. सुहास निकम, डॉ.दत्ता साकोळे, प्रा. नवनाथ झाडके, प्रा. प्रणिता खोसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुशील शेळके यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. जे.एच.काझी यांनी केले. प्रा. ज्ञानेश चिंते, सुशील जमाले, प्रा.दीपक सूर्यवंशी , प्रा. डॉ. ईश्वर राठोड, प्रा.डॉ.एन.जी.साठे, डॉ. जयवंत ढोले,आदी उपस्थित होते यावेळी महाविद्यालयातील नातेवाईक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बनावट आधार कार्ड मोफत बस प्रवासासाठी; एसटीला बसतोय आर्थिक फटका

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**
**छत्रपती संभाजीनगर :** शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून महिला प्रवाशांसाठी निम्मे भाडे, तर ७५ वर्षांपेक्षा अधिक वय असलेल्या नागरिकांसाठी मोफत एसटी प्रवास योजना सुरू केली आहे. यामुळे एसटीचा प्रवासी वाढला खरा, परंतु मोफत प्रवास करण्यासाठी बहुसंख्य प्रवाशांनी आधार कार्डवरील जन्मतारीख एडिट करून अशा प्रकारचे दोन ते चार आधार कार्ड बनवून त्याद्वारे मोफत प्रवास करण्याचा फंडा सर्रासपणे सुरू केला आहे. एसटी महामंडळाकडे आधार कार्ड तपासण्यासाठी यंत्रेच उपलब्ध नसल्याने, प्रवासी जे कार्ड दाखवतील, त्यानुसार तिकीट देण्याखेरीज वाहकाकडे दुसरा पर्याय नाही. अशा पद्धतीने प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी असल्याने एसटीमध्ये ठरवून दिलेल्या प्रवासी क्षमतेपेक्षा दुप्पट प्रवासी प्रवास करीत असल्याने याचा फटका बसगाड्यांना बसत आहे. चाळिशीत असलेले प्रवासी पंच्याहत्तर वर्षांपेक्षा जास्त वयाचे आधार कार्ड सोबत घेऊन मोफत प्रवास करीत आहेत.
हे सर्व वाहकास उमजत असतानाही त्यावर मात्र काहीही कार्यवाही करता येत नसल्याने समोर फसवणूक होत आहे. परंतु, त्यामध्ये निमूटपणे भागीदार होण्याखेरीज वाहकांकडे दुसरा पर्यायच उरत नाही, याचा फटका एसटीच्या उत्पन्नास मोठ्या प्रमाणात बसत आहे. त्यामुळे आता एसटी प्रशासनाने तिकिटांच्या डिजिटल मशीनमध्येच अशा पद्धतीच्या आधार कार्डची तपासणी करण्यासाठी पावले उचलणे आवश्यक असून, यामुळे एसटीला चुना लावण्याचा प्रकारदेखील नियंत्रणात येऊ शकतो. प्रवासी एक अन् आधार कार्ड चार 'एसटीचा प्रवास सुरक्षित प्रवास' अशी सर्वच प्रवाशांची धारणा आहे. त्यामुळे एसटीचा प्रवासीवर्ग टिकून आहे. परंतु, त्याला आता मोफत प्रवासाचे ग्रहण लागले आहे. अशा पद्धतीने मोफत प्रवास करणाऱ्या खिशात जन्मतारीख बदललेले दोन ते चार आधार कार्ड बघावयास मिळतात. हे वाहकासदेखील कळते, परंतु प्रवाशांशी वाहक हुज्जत घालू शकत नाही, तर उलट असे प्रवासीच वाहकांच्या तक्रारी महामंडळाकडे करीत असल्याच्या अनेक घटना समोर आल्या आहेत.



आधार कार्डमध्ये जन्मतारीख खरी आहे की खोटी, हे तपासण्यासाठी आवश्यक यंत्रे उपलब्ध नाही . त्यामुळे लाइनवर तपासणी करत असताना अधिकारी फक्त आधार कार्ड बघतात . फसवेगिरी करून प्रवासी प्रवास करीत असल्यास त्यावर कारवाई करण्या येते . बनवाबनवी करून आधार कार्ड केल्याची घटना समोर आल्यास त्याला वाहकास जबाबदार धरण्यात येत नाही . त्यांच्यावर कारवाई करताना आम्हीदेखील योग्य ती काळजी घेतो . परंतु, सध्यातरी अशा पद्धतीने जन्मतारीख तपासण्यासाठी यंत्रे उपलब्ध नाही .
**विजय काळवणे आगार प्रमुख सोयगाव**

# रानडुकरांमुळे मका पीक झाले आडवे

## परिसरातील रानडुकरांचा धुमाकूळ, शेतकरी त्रस्त; अजिंठा वनपरिक्षेत्र सुस्त : संभाजी पवार

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यातील रवळा जवळा येथीलः परिसरातील दहा ते पंधरा गावांच्या शिवारात रानडुकरांनी धुमाकूळ घातला असून, कापणीसाठी आलेल्या रब्बीच्या मका, गहू, ज्वारी आदी पिकांचे त्यांच्याकडून नुकसान केले जात आहे. रवळा,जवळासह परिसरातील जामठी, डाभा, देव्हारी, फर्दापूर, घाणेगाव तांडा, मोलखेडा, टिटवी पळसखेडा,नांदा तांडा या गावांच्या शेतशिवारात रानडुकरांच्या कळपाने गेल्या काही दिवसांपासून धुमाकूळ घातला आहे. अशाच धुमाकूळ रवळा येथील शेतकरी विमलबाई विश्वनाथ पवार  गट नंबर ६८ मधे मक्का व ज्वारी पिकाचे दोन एक्कर शेतात रात्री धुमाकूळ घातला आहे. विमलबाई पवार  यांनी झटका मशीन लावून शुद्धा रात्रीच्या वेळी झटका मशीनचे तार तोडून रान डुक्करांनी शेताच्या आतमधे प्रवेश करुन राजपूत यांच्या रब्बी पिकांचे मोठ्या प्रमाणात दोन एक्कर पिकांचे नुकसान केले आहे.ही रानडुकरे रब्बीच्या वाढलेल्या पिकांमध्ये दबा धरून बसतात. तसेच या पिकांचे नुकसान करतात. त्यामुळे उभी पिके आडवी झाली आहेत. याबाबत शेतकऱ्यांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांना माहिती दिली आहे; परंतु गेल्या दोन दिवसांपासून वन विभागाचा एकही अधिकारी इकडे फिरकलेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकांना वाचवण्यासाठी पहारा द्यावा लागत आहे.अशात रानडुकरांकडून हल्ला केला जाईल, अशी भीती शेतकऱ्यांना वाटत असल्याने ते जीव मुठीत घेऊन पिकांचे रक्षण करत आहेत. वन विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष द्यावे, आणि नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या शेताचे पंचनामे करून त्यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी संभाजी पवार तालुका रवळा ता सोयगाव यांनी केली आहे.



## परवानाधारकांनी केले शस्त्र जमा

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील पोलिस ठाण्यात



फर्दापूर परिसरातील परवाना देण्यात आलेल्या ७ पैकी ७ जणांनी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली शस्त्र फर्दापूर ठाण्यात जमा केली आहेत, अशी माहिती आनंद पगारे अंमलदार यांनी बोलताना दिली आहे. फर्दापूर पोलिस ठाण्यांतर्गत ७ जणांनी शस्त्रांचा परवाना पोलिसपरवानाधारकांनी जमा केले. शस्त्र छत्रपती संभाजीनगर अधीक्षक कार्यालयाकडून घेतला आहे. आता लोकसभा निवडणूक सुरू असल्याने पोलिस प्रशासनाने परवानाधारकांना ठाण्यात शस्त्र जमा करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार रविवारपर्यंत सात परवानाधारकांनी पोलिस ठाण्यात आपल्याकडील शस्त्र जमा केली त्यात सात रायफल जमा केली आहे.

उर्वरित शस्त्र परवानाधारकांनी दि. २ एप्रिलपर्यंत आपली शस्त्र पोलिस ठाण्यात जमा करावीत, असे आवाहन सहायक पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे फर्दापूर पोलिस स्टेशन यांनी केले आहे.

## सोयगाव तालुक्यात शिधा वाटपाला लागला ब्रेक

आधुनिक केसरी न्यूज

**गोकुळसिंग राजपूत**

**सोयगाव :** तालुक्यात व सावळदबारा परिसरात आचारसंहिता मुळे रेशन दुकानातून अंत्योदय लाभार्थ्यांना साडीचे वितरण करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला होता. काही दुकानांमधून याचे वितरणही करण्यात येते होते. मात्र, आता २०२४ लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने साड्या, पिशव्यांचे वितरण जिल्हा पुरवठा विभागाकडून थांबविण्यात आल्याने कार्डधारक लाभार्थी हैराण झाले आहेत.शासकीय सोपस्कार पूर्ण करण्यात बराच वेळ गेल्याने १५ दिवसांपूर्वी तालुकास्तरावर या साड्या उपलब्ध झाल्या होत्या. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना या साड्या मिळालेल्या नसताना, निवडणुकीची आचारसंहिता लागल्यामुळे लाभाच्यर्थ्यांना साड्या वाटप न करण्याचे आदेश जिल्हा पुरवठा विभागाने रेशन दुकानदारांना काढले आहेत, तसेच प्रशासनातर्फे साडीची एंट्री पॉस मशीनमध्ये करण्यात आली होती,

> एप्रिल महिन्यात रमजान ईद, गुढीपाडवा, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव साजरा होत आहे मात्र आचारसंहिता लागू असल्याने मंत्री महोदय यांच्या फोटो असल्याने एप्रिल महिन्यात शिधा किवा साडी वाटप करण्यासाठी अजूनही वरिष्ठ अधिकारी अधिकारी यांच्या कडून आदेश जारी करण्यात आले नसुन वरिष्ठ कार्यालयाकडून आदेश मिळताच साडी व आनंदाचा शिधा सोयगाव तालुक्यात वाटप करण्यात येईल .
> **नाना मोरे, सोयगाव पुरवठा अधिकारी**

मात्र आता लोकसभा आचारसंहितेमुळे ही एंट्री काढून टाकण्यात आली आहे. त्यामुळे दुकानदार साडीचे वितरण करू शकणार नाहीत. तसेच पिशव्याही वितरित न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सोयगाव तालुक्यात अंत्योदयचे बरेचसे लाभार्थ्यांना साड्या मिळाल्या बाकीना वाटपाचा लाभ मिळणार होता. सोयगाव तालुक्यातील प्रत्येक स्वस्त धान्य दुकानातून विविध योजनाचा लाभ मिळत असतो. आचारसंहितेच्या काळात लाभार्थ्यांच्या योजनाना खिळ लागत असल्याने अंत्योदय योजनेचे लाभार्थी अडचणीत सापडले आहेत. आचारसंहितेचे उल्लंघन होईल कारणं रेशन दुकानातून देण्यात येणाऱ्या वस्तूवर सत्ताधाऱ्यांचे फोटो असतील तर आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन होणार आहे. त्यामुळे एक प्रकारे शासनाची जाहिरात होऊन आचारसंहितेचे उल्लंघन होईल.

मात्र, ग्रामीण भागात याची पुरेशी कल्पना नसल्याने वाद होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. आचारसंहितेच्या काळात येणाऱ्या सणामध्ये आनंदाचा शिधा वाटप करण्यात येणार नसल्याने किंवा यापूर्वी आनंदाचा शिधा नेण्यासाठी राज्य शासनाकडून पिशवी उपलब्ध करून देण्यात आली होती.मात्र, त्या पिशव्यांवर मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांचे फोटो आहेत. आता आचारसंहिता असल्याने अशा पिशव्या देणे शक्य होणार नाही. त्यामुळे लाभाथ्यर्थ्यांना आनंदाचा शिधा घेण्यासाठी पुढील काही दिवस प्रत्यक्षात राहावे लागू शकतो? म्हणून अंतोदय साडी लाभार्थ्यांना लोकसभा निवडणुक झाल्यावर हा लाभ मिळणार असल्याची या चर्चेला उधाण आला आहे.



**अकोले येथील एम.बी.बी.एस. ची परीक्षा विशेष प्रविण्य मिळावीत उत्तीर्ण झाल्याबद्दल  कु. मधुरा वैभवराव पिचड हिचा माजी प्राचार्य अशोक वैराट सर यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राजूरच्या माजी सरपंच हेमलताताई पिचड, भाजपा नेते भाऊसाहेब वाकचौरे, शिवसेना ठाकरे गटाचे तालुका समन्वयक रावसाहेब वाकचौरे, कळस चे माजी उपसरपंच ज्ञानेश्वर वाकचौरे, मराठा महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष ज्ञानदेव निसाळ, प्रसाद वाकचौरे, सुयोग वाकचौरे, दिपक वाकचौरे, अभिषेक वाकचौरे आदी उपस्थित होते. माजी मंत्री मधुकरराव पिचड यांची नात व माजी आमदार वैभवराव पिचड यांची कन्या असतानाही वैद्यकीय क्षेत्रात प्रवेश मिळवून एम.बी.बी.एस. ची परीक्षा विशेष प्रविण्य मिळावीत उत्तीर्ण झाली. ही आजच्या विद्यार्थी यांच्यासाठी प्रेरणादायी गोष्ट आहे.**

## भीमजयंती अध्यक्षपदी शालिकराम जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथे विश्वरत्न डॉ.



बाबासाहेब आंबेडकर  यांच्या १३३ जयंती सोहळ्यातच्या पुर्व तयारीसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्या जवळ पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी सर्व संमतीने आंबेडकरवादी जयंती उत्सव समितीची कार्यकारणी पुढीप्रमाणे निवड करण्यात आली.अध्यक्षपदी शालिक जाधव,तर उपाध्यक्षपदी भगवान जाधव, कोषाध्यक्षपदी दिलीप सुरडकर यांची निवड करण्यात आली. या जयंती उत्सव समितीच्या बैठकीचे सूत्रसंचालन मोहन सुरडकर यांनी करुन उत्सव समितीच्या कार्यकारणीची घोषणा केली. यावेळी उत्सव समितीचे पदाधिकारी भास्कर प्रल्हाद सुरडकर, आकाश विक्रम सुरडकर,प्रभाकर सुरडकर, रमेश भिवसने,नंदकिशोर  सुरडकर,माजी सरपंच समाधान सुरडकर,गौतम बनकर, आत्माराम सुरडकर,राहुल प्रकाश जाधव, नामदेव हरी सुरडकर,मिलींद सपकाळ, अजय गायकवाड, आकाश जाधव, , सुरेश  सुरडकर. अरुण सुरडकर, सतिश जगताप, सागर सुरडकर, आमोल सुरडकर, संदीप बनकर. जनार्धन जाधव, सुधाकर साळवे, सिध्दार्थ साळवे. सुमित सुरडकर, विजय आगळे, सुनील बाळू सुरडकर,अलकेश सुरडकर, अनिल सुरडकर,भागवत जाधव,प्रकाश बनकर, समाधान जाधव, रामदास  सुरडकर, नंदु मोरे,सदरील बैठकीत तेरा दिवसांनी येणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती २०२४ बाबत चर्चा झाली. तसेच आंबेडकर जयंती मोठ्या उत्साहात व शांततेत पार पाडण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी केला. विविध भागांतील असंख्य ग्रामस्थ व भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शिंदे गटाची अवस्था 'ना घर का ना घाट का' : विजय वडेट्टीवार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीच्या उमेदवारांचे चित्र आता जवळपास स्पष्ट झाल्यानंर राजकीय पक्ष आणि पुढारी प्रचाराला लागले आहेत. त्यामुळे एकमेकांच्याविरोधात टीका-टिप्पणीला जोर आला आहे. महायुतीच्या जागावाटपात शिंदे गटाला झुकते माप घ्यावे लागले. त्यांनी जाहीर केलेल्या एका उमेदवाराला ऐनवेळी मागे घ्यावे लागले तर यवतमाळच्या विद्यमान खासदाराचा पत्ता कट करण्यात आला. यामुळे शिंदे गटावर महाविकास आघाडीतर्फे टीका होत आहे. विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही माध्यमांशी बोलताना शिंदे गटावर जोरदार टीका केली. 'ना घर का ना घाट का', अशी शिंदे गटाची अवस्था झाल्याचे वडेट्टीवार म्हणाले. शिंदे गटावर टीका करताना विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले, 'ना घर का ना घाट का', अशी वेळ शिंदे गटावर आली आहे. उद्धव ठाकरे भेटत नाही, अशी सबब सांगून शिंदे गट बाहेर पडला. पण आता त्यांना लोकसभेचे मतदारसंघही भेटत नाहीत, हे सर्वच पाहतायत. शिंदे गटाच्या आमदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. त्यांचे निम्मे आमदार उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. शिवसेनेचे नेते खासगीत ही बाब बोलून दाखवितात. याचाच अर्थ असा आहे की, विरोधक गोंधळलेले आहेत. शिंदे गट आणि अजित पवार गटात अस्वस्थतता असून उमेदवार निवडीसंदर्भात त्यांची दमछाक होत आहे. या सर्व परिस्थितीत महाविकास आघाडी महाराष्ट्रात तरी महायुतीचा विजय रथ रोखेल. विदर्भात काँग्रेसला अनुकूल असे वातावरण आहे. काँग्रेसचा पाचही जागांवर विजय होईल. लोकांमध्ये सत्ताधाऱ्यांबाबत प्रचंड नाराजी आहे. स्वतंत्र भारतात आपण गुलाम होऊ, अशी भीती लोकांना वाटत आहे. त्यामुळे भाजपाला सत्तेबाहेर काढायचे, असे लोकांनी ठरविले असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

वडेट्टीवार म्हणाले की, राहुल गांधी यांची विदर्भात जाहीर सभा होणार आहे. विदर्भातील लोकांचा पाठिंबा या सभेला मिळेल. राहुल गांधी यांनी त्याग आणि संघर्ष सुरू केला आहे. त्यामुळे राहुल गांधी यांच्याबद्दल एक वेगळे वातावरण सामान्य जनतेमध्ये निर्माण झाले आहे. त्यांच्या सभेला प्रचंड गर्दी होईलच. तसेच पाचही लोकसभा मतदारसंघात या सभेमुळे एक परिवर्तनाची लाट निर्माण झाल्याचे दिसेल.

सांगलीच्या जागेबाबत आता वाद घालण्यात अर्थ नाही, असे सांगताना विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, सांगली मतदारसंघावर सुरुवातीपासूनच काँग्रेसचा दावा होता. पण आता आम्ही हा विषय ताणून धरणार नाही. आमचे पक्षश्रेष्ठी याबाबत निर्णय घेणार आहे. त्यानुसार आम्ही काम करू. परंपरागत जागा दुसऱ्या पक्षाला गेल्यानंतर सुरुवातीला थोडी नाराजी असते. पण ती दूर करण्याचा प्रयत्न करू.




# महाराष्ट्राच्या सत्तेची किल्ली विदर्भातील नेतृत्वाकडे येणार

## काँग्रेस नेते व माजी मंत्री सतीश चतुर्वेदी यांचा विश्वास

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** लोकसभा निवडणुकीत नागपूर आणि महाराष्ट्रात काँग्रेसचे अधिकाधिक खासदार निवडून आल्यास नाना पटोले यांना आगामी विधानसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होण्याची संधी मिळणार आहे. त्यांच्या रुपाने महाराष्ट्राच्या सत्तेची किल्ली विदर्भातील नेतृत्वाकडे येणार आहे, असा विश्वास काँग्रेस नेते व माजी मंत्री सतीश चतुर्वेदी यांनी केले. इंडिया आघाडीचे उमेदवार विकास ठाकरे यांच्या प्रचारार्थ ताजबाग, रघुजीनगर येथे जनसभा गुरुवारी सायंकाळी आयोजित करण्यात आली. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, चंद्रकांत हांडोरे, अभिजीत वंजारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे सलील देशमुख, शेखर सावरबांधे, दीनानाथ पडोळे, अशोक धवड, गिरीश पांडव, विशाल मुत्तेमवार, अतुल लोंढे, संजय महाकाळकर, किशोर कुमेरिया, दुनेश्वर पेठे, प्रशांत धवड, वजाहत मिर्झा यांची प्रमुख उपस्थिती होती.पटोले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होतील आणि त्यांच्या माध्यमातून सत्तेची किल्ली विदर्भात येईल असा दावाही त्यांनी केला. नाना पटोले यांच्या रुपात विदर्भाला एक नेतृत्व मिळाले आहे. ते महाराष्ट्राचे नेतृत्व करीत आहेत. ते महाराष्ट्राचे भावी मुख्यमंत्री आहेत. जर लोकसभेत नागपूर आणि महाराष्ट्रात काँग्रेसला विजय मिळाल्यास विदर्भाच्या हातात संपूर्ण महाराष्ट्राच्या नेतृत्व येणार आहे, असेही ते म्हणाले. केंद्रातील भाजप सरकार अहंकारी झाल असून मनमानी कारभार करीत आहे. त्याचा जनसामान्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. मुलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करुन आभासी भौतिक विकासाचे चित्र रंगविण्याचा प्रयत्न सरकारकडून होत आहे, जनतेला हे समजले असून आता अहंकारी सरकारचे पायउतार केल्याशिवाय शांत बसणार नसल्याचा निर्धार उत्तर नागपुरातील जनतेने केला आहे, असे विकास ठाकरे म्हणाले.



# इंडिया बुकमध्ये नोंद झालेल्या सुरवीची आ. किशोर जोरगेवार यांनी घेतली भेट

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** वयाच्या अवघ्या 19 व्या महिन्यात विविध 98 वस्तु ओळखणाऱ्या घुग्घुस येथील सुरवी समिंद्र साळवे हिचे इंडिया बुकमध्ये नोंद झाली आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी घुग्घूस येथील तिच्या राहत्या जात तिची भेट घेत अभिनंदन केले आहे.

यावेळी यंग चांदा ब्रिगेडचे घुग्घूसचे नेते इमरान खान, प्रेम गंगाधरे, डॉ. गौतम, मयुर केवले, राजू नाथर, मंगेश भोयर, देविदास अमृतकर, आशिष वाघमारे, समींद्र साळवे, पुजा साळवे, अर्चना साळवे, उमा महल्ले, अंजु ठोंबरे, शशिकला वाघमारे, दिपा वाघमारे, स्मिता यदुवंशी, प्रिया गौरकार, आशा टोंगे, संध्या कन्नूर, अंनु सिंग, किरण मदनकर, स्नेहा जेऊरकर, लिखिता ठोंबरे, संजय महल्ले आदींची उपस्थिती होती.

घुग्घुस मधील राम नगर या ठिकाणी वास्तव्यास असणाऱ्या अवघ्या एकोणीस महिन्यांच्या सुरवी या चिमुकलीने आपल्या अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर इतिहास घडवला आहे. फक्त १९ महिन्यांची सुरवी या वयात तब्बल ९८ वस्तू ओळखत असून तिच्या या तल्लख बुद्धीची नोंद 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' ने घेतली आहे. दरम्यान आमदार किशोर जोरगेवार यांनी सुरवीच्या घरी तिची भेट घेत अभिनंदन केले आहे. यावेळी सुरवीन चित्रातील अनेक वस्तू, पक्षी ओळखून दाखविले.

या लहान वयात आपल्या मुलीवर चांगले संस्कार करणारे आणि तिच्या ठायी असणारी बुद्धिमत्ता ओळखणारे पालकही कौतुकास पात्र आहेत. तिचे हे यश नक्कीच अभिमानास्पद असून या चिमुकलीने भविष्यात आपल्या चंद्रपूरचे आणि पर्यायाने देशाचे भविष्य उज्ज्वल करावे, अशी आशा यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केली. यावेळी स्थानिक नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# घरफोडी करणारी टोळी पोलिसांच्या ताब्यात

## २५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** सिन्नर तालुक्यातील वावी येथे दिवसा घरफोडी करणाऱ्या टोळीस स्थानिक गुन्हे शाखेने जेरबंद केले. त्यांच्याकडून २५ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. संशयितांना पुढील तपासासाठी वावी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. वावी येथील मयुरेश काळे यांच्या बंद घराचा कडीकोयंडा दुपारच्या सुमारास काढून चोरांनी रोख रक्कम , दागिने लंपास केले. या गुन्ह्याचा तपास करत असताना स्थानिक गुन्हे शाखेला काही माहिती मिळाली. तांत्रिक तपास करुन सुनील म्हस्के (३१, साबरवाडी), चांगदेव देवडे (३५, बदापूर), कैलास मढवई (३४, चिंचोडी), अक्रम शेख (३१, विंचुर रोड), जीवन कोल्हे (२६, हडप सावरगाव), अलका जेजूरकर (४८, येवला) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून चोरलेल्या रोख रकमेतील १४ लाख सात हजार रुपये, चोरीस गेलेले दागिने, चोरीच्या पैशांतून खरेदी केलेला भ्रमणध्वनी, गुन्ह्यात वापरलेले वाहन असा २५ लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तक्रारदार काळे आणि अलका जेजूरकर यांची ओळख होती. जेजूरकरला काळे यांच्याकडे असणारे पैसे आणि अन्य मुद्देमालाची माहिती होती. गुन्हा घडला त्या दिवशी संशयितांपैकी दोघांनी काळे यांना शिर्डी येथे खरेदीसाठी नेले. तसेच इतर संशयितांनी काळे यांच्या घराची टेहेळणी करुन घरफोडी करत रोख रक्कम व देवीच्या अंगावरील सोन्याची दागिने लंपास केले. संशयितांना वावी पोलीस ठाण्याकडे चौकशीसाठी ताब्यात देण्यात आले आहे.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

# राहुल गांधी, उद्धव ठाकरेंकडून महिलांचा अवमान

## अमरावती येथील सभेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा घणाघात

आधुनिक केसरी न्यूज

**हनुमान चालीसा भारतात नाही म्हणायचा तर पाकिस्तानात म्हणायचा का?** हनुमान चालीसा म्हणल्याबद्दल खा. नवनीत राणा यांना तुरुंगात टाकणाऱ्या उद्धव ठाकरे यांच्या मविआ सरकारवर श्री.फडणवीस यांनी जोरदार टीका केली. हनुमान चालीसा भारतात म्हणायचा नाही तर पाकिस्तानात म्हणायचा का, असा सवालही त्यांनी केला.




**अमरावती :** हनुमान चालीसा म्हणल्याबद्दल खा. नवनीत राणा यांना 14 दिवस तुरुंगात ठेवणाऱ्या उद्धव ठाकरे, काँग्रेसच्या राहुल गांधी यांनी महिला शक्तीचा वारंवार अवमान केला आहे. 33 टक्के आरक्षण देऊन महिला शक्तीचा सन्मान करणाऱ्या नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्यासाठी भारतीय जनता पार्टी-महायुतीच्या उमेदवार खा. नवनीत राणा यांना प्रचंड मतांनी विजयी करा,असे आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केले. अमरावती मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी - महायुतीच्या उमेदवार खा. नवनीत राणा यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी झालेल्या जाहीर सभेत श्री.फडणवीस बोलत होते. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष श्री. चंद्रशेखर बावनकुळे, खा. डॉ.अनिल बोंडे, खा.रामदास तडस, रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते जोगेंद्र कवाडे, आ. रवी राणा, आ. प्रवीण पोटे यांच्यासह महायुतीचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

फडणवीस यांनी नवनीत राणा यांचे जात प्रमाणपत्र सर्वोच्च न्यायालयाने वैध ठरविल्याची "गुड न्युज "आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच दिली. ते म्हणाले की न्यायालयाचा निकाल म्हणजे सत्याचा विजय आहे. जात, धर्म, पंथ न मानणा-या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गरिब, शेतकरी, आदिवासी, महिला यांच्या कल्याणाचा अजेंडा राबविला. 31 कोटी महिलांना कर्जे तर 83 लाख महिला बचत गटांना 8 लाख कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले.

भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी खा.नवनीत राणा यांच्या संसदीय कारकीर्दीचा गौरव केला. बावनकुळे म्हणाले की, खा.राणा यांनी लोकसभेत अमरावती मतदासंघाबाबत 534 प्रश्न विचारले. 113 चर्चांमध्ये भाग घेतला. अशा अभ्यासू खा.राणा यांना मतदार निवडून देतील.

# महा - ई सेवा केंद्राकडून केवायसीच्या नावाखाली शेतकऱ्यांची मोठी लूट

## जिल्हा अध्यक्ष काशिनाथ जाधव

आधुनिक केसरी न्यूज

**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील महा-ई सेवा केंद्राकडून



के वाय सी शासनाने बंधन कारक केली आहे. नुकसान भरपाई मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना केवायसी करणे आवश्यक असून अन्यथा आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागते. पण फुलंब्री परिसरात महा -ई सेवा चालकांकडून शेतकऱ्यांची मोठी लूट, फसवणूक केल्याचे समोर आले यांना कोणाचा आशिर्वाद आहे. अशी माहिती काशिनाथ जाधव छत्रपती संभाजी नगर जिल्हा अध्यक्ष शरद जोशी संघटना यांनी बोलताना सांगितले. अतिवृष्टी, सीव्हीएम आदी नुकसान भरपाई बाबतचे शासकीय अनुदान काही शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा होण्यास सुरुवात झाली आहे; तर काही अनुदान टप्याटप्यात दिले जात असल्याने नागरिकांना वारंवार बँक खाते केवायसी करावे लागत आहे. संबंधित शेतकऱ्यांना केवायसी करणे आवश्यक असून ज्या शेतकऱ्यांनी केवायसी केली नसल्यास त्यांना आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे केवायसी करणे आवश्यक झाले आहे. याचा मोठा फायदा महा ई सेवा केंद्र चालक घेत आहे वीस रुपये घेण्याऐवजी दिडशे रुपये घेत आहे. फुलंब्री तालुक्यात व फुलंब्री परिसरात किती शेतकरी असतील वंचित असलेल्या शेतकऱ्यांकडून १५० रुपये घेतले जात आहे. तर एका शेतकऱ्याला दोन के वाय सी अनिवार्य करण्यात आलेल्या आहेत तर एका शेतकऱ्याना 300 रु मोजावे लागतात. फुलंब्री महा -ई सेवा केंद्रावर हि परिस्थिती आहे तर फुलंब्री तालुक्यातील तीस ते पस्तीस महा ई सेवा केंद्र चालकांची किती बोर पकलेली असल्याची

शेतकऱ्यांच्या खात्यात थेट जमा केली जाते. त्यासाठी बँक खाते क्रमांक व ग्राहक क्रमांकाची पडताळणी केली जाते. ग्राहकाचे नाव किंवा बँक खाते क्रमांक चुकले तर संबंधितांच्या खात्यात सानुग्रह अनुदानाची रक्कम जमा होत नाही. शासनाकडून मिळत असलेली मदत टप्याटप्यात दिली जात आहे. यासाठी फुलंब्री तहसील कार्यालयाच्या यादीतहलाभाध्यांची नावे प्रकाशित केली जातात, ज्यावेळी यादीत नाव येईल, त्या-त्या वेळी लाभार्थ्यांना मिळणा- या शासकीय अनुदानाकरिता तलाठी स्तरावर मिळणारे विशिष्ट क्रमांक टाकूनच स्वतःचे बँक खाते केवायसी करावे लागते, अन्यथा शासनाच्या सानुग्रह अनुदानाचा लाभ मिळत नाही. शासनाकडून अनुदानाची रक्कम जाहीर होताच बँक खाते केवायसी करण्यासाठी नागरिकांची गर्दी होते. ई केवायसी करताना अनेकदा कधी लिंक ओपन होत नाही तर कधी वेबसाइट बंद असते, अशा तांत्रिक अडचणी येत असल्याचे माहिती महा ई सेवा केंद्राकडून मिळते आणि पैसे जास्त दिले की तांत्रिक अडचणी दूर होतात. त्यात महा ई-सेवा केंद्रावर केवायसी करण्यास निर्धारित शुल्कापेक्षा जास्त रक्कम आकारली जात असल्याने शेतकऱ्यांना केवायसीचा मोठा मनस्ताप होत आहे. अशावेळी काही ठिकाणी ई-सेवा केंद्रचालक गैरफायदा घेत असतात. २० रुपये निर्धारित शुल्क असताना १०० ते १५० रुपये घेत असल्याचे समोर आले आहे. असे कार्यकर्ते व शेतकऱ्यांचे मान्य आहे तरी माननीय तहसीलदार साहेब फुलंब्री यांनी याकडे लक्ष घालावे नसता लोकशाही पद्धतीने शेतकऱ्यांचा तहसील कार्यालयावर मोर्चा आणावा लागेल.

# नाशिकमध्ये समाजमाध्यमातील वादग्रस्त संदेशामुळे जमावाकडून दगडफेक

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** समाज माध्यमात वादग्रस्त संदेश टाकल्यामुळे संतप्त जमावाने उपनगर पोलीस ठाण्याला घेराव घालत संशयितावर कारवाईची मागणी केली. याच काळात रस्त्यावरील वाहनांवर दगडफेक झाल्यामुळे तणावाची स्थिती निर्माण झाली. पोलिसांनी तातडीने चक्रे फिरवत रात्री एक वाजता संशयिताला अटक केल्यानंतर परिस्थिती निवळली. वादग्रस्त संदेश प्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

समाजमाध्यमातील वादग्रस्त संदेशाने धार्मिक भावना दुखावल्याची तक्रार करत बुधवारी रात्री जमाव आक्रमक झाला. याप्रकरणी गुन्हा दाखल करावा, संशयिताला तत्काळ अटक करावी, अशी मागणी करुन द्वारका, उपनगर आणि दत्तमंदिर चौकात जमाव रस्त्यावर उतरला. नाशिक-पुणे महामार्गावर उपनगर पोलीस ठाणे आहे. या ठिकाणी रात्री गटागटाने लोक जमा होऊ लागले. एक-दोन तासात या ठिकाणी मोठा जमाव जमा झाला. काहींनी रस्त्यावरील वाहनांवर दगडफेक केली. नाशिकरोडच्या सेंट झेविअर्स शाळेसमोर महामार्गावर जमावाने ठिय्या दिला. वाहतूक ठप्प झाल्यामुळे महामार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. या घटनाक्रमाने तणावाची स्थिती निर्माण झाली. पोलीस उपायुक्त (गुन्हे) प्रशांत बच्छाव, उपायुक्त मोनिका राऊत, डॉ. सचिन बारी आदी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी धाव घेत परिस्थिती हाताळली. जमावाची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. परंतु, कुणी ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते. संशयिताला अटक करून आमच्या ताब्यात द्यावे, अशी मागणी केली जात होती. पोलिसांनी तातडीने चक्रे फिरवत रात्री एक वाजता संशयिताला अटक केली. त्याची माहिती जमावाला दिल्यानंतर परिस्थिती निवळली, असे पोलीस उपायुक्त बच्छाव यांनी सांगितले. दगडफेकीत पोलिसांच्या वाहनांसह काही गाड्यांचे किरकोळ नुकसान झाले. पोलिसांनी संशयिताला अटक केल्याची चित्रफित सादर केल्यानंतरही काही जण ऐकायला तयार नव्हते. रात्री उशिरा त्यांची समजूत काढल्यानंतर त्यांना घरी पाठविण्यात आले. परिस्थिती हाताळण्यासाठी दंगा नियंत्रण पथकासह मोठी कुमक या भागात तैनात केली होती.

शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# पिण्याच्या पाण्याची चोरी, सरपंचांनी केली पुराव्यानिशी पंचायत समितीकडे तक्रार

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** ग्रुप ग्रांमपंचायत आनंदपुर-श्रृंगारवाडी ता . पैठण या गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या मुख्य जलवाहिनीस चोरुन कनेक्शन घेवून शेत जमिनीत पिके घेत असल्याने संबधितावर कायदेशीर कार्यवाही करणे बाबत तक्रार सादर करण्यात आली की , ग्रुप ग्रामपंचायत आनंदपुर - श्रृंगारवाडी अंतर्गत आनंदपूर गावात प्रादेशिक पाणीपुरवठा योजना अंतर्गत पाणी पुरवठा होत असून आनंदपूर- आपेगांव - वडवाळी - वाघाडी अश्या चार गावासाठी जायकवाडी धरणातून पाणी पुरवठा योजना चालु आहे . सदर योजनेचे पाणी शुध्दीकरण केंद्र वडवाळी येथे असून वडवाळी ते आनंदपूर गावात जाणाऱ्या मुख्य जलवाहिनी ही वडवाळी शिवारातील शेत जमिन गट नं . 75/1 मधील सामाईक



शेती असलेले शेतकरी रुख्मीनीबाई व्यंकट पवार , भागवत व्यंकट पवार, सतिष व्यंकट पवार, मनिषा अनिल पठाडे यांची शेती आनंदपुर रस्त्या लगत आहे. सदरील मुख्य जलवाहिनी मधुन वरील शेतकऱ्यांनी चोरीने अनाधिकृत नळ जोडणी करुन त्याचे पाणी त्यांचे शेतातील बोअर मध्ये सोडुन त्याचा वापर ते शेतातील पिकासाठी गेल्या अनेक दिवसापासून करत आहे. यामुळे गुप ग्रामपंचायत आनंदपूर गावातील गावातील पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन मधुन पाणी कमी येत असल्याने गावकऱ्यांना त्याचा त्रास होत आहे . गावात पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. गावातील पाणी पुरवठा करणाऱ्या पाईप लाईन मधुन पाणी कमी येत असल्याने सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं.सदस्य व ग्रामस्तांनी या सर्व पाईप लाईनची तपासणी केली असता सदरील अनाधिकृत कनेक्शन आढळुन आले आहे . तरी संबधिता विरुध्द गावचे पाणी पुरवठा लाईनला अनाधिकृत कनेक्शन घेतल्या बाबत संबंधितावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणीचे निवेदन आनंदपुर सरपंच सौ.वर्षा सोपान खराद,उपसरपंच मिरा ज्ञानेश्वर चिंधे,माजी सरपंच संगिता विनोद खराद,सदस्य ज्योती संतोष खराद,बनकर,उषा श्रीराम बनकर,विलास माणिक खराद यांनी ग्रामस्थांच्या सही निशी उपअभियंता पाणी पुरवठा , उपविभाग पंचायत समिती पैठण, ता . पैठण , जि . छत्रपती संभाजीनगर.याच्या कडे संबंधीतावर तात्काळ पंचनामा करून कारवाई करण्यात यावी म्हणून केली आहे.

# खंडाळा ग्रामपंचायतचा भोंगळ कारभार अखेर उघडकीस

## खंडाळा ग्रामपंचायत सरपंच श्रीमती कौशाबाई थोरात अपात्र

आधुनिक केसरी न्यूज

**राहुल त्रिभुवन**

**वैजापूर :** तालुक्यातील खंडाळा ग्रामपंचायतचा नुकताच भोंगळ कारभार उघडकीस झाला असून यात खंडाळा येथील ग्रामपंचायत सदस्य तथा सरपंच श्रीमती कौशाबाई थोरात यांना छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्त मधुकर अर्दड यांनी सरपंच पदावरून काढून टाकत उर्वरित कालावधीसाठी अपात्र घोषित केले आहे. सविस्तर माहिती अशी की छत्रपती संभाजीनगर येथील रवींद्र गाडेकर यांनी खंडाळा ग्रामपंचायत च्या मनमानी कारभारा विरोधात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,1958 चे कलम 39(1) अन्वये कारवाई साठी 2023 मध्ये प्रस्ताव सादर केला होता. या प्रस्तावात सरपंच कौशाबाई थोरात यांनी अधिकार नसताना त्यांच्या सरपंच कालावधीत खोटे वारस प्रमाणपत्र दिले असून त्यांची धारणा संशयास्पद असल्याचे म्हटले होते.

सदरील प्रकरणात महाराष्ट्र ग्रामपंचायत कायदा अंतर्गत दोषी आढळून आल्याने त्यांना सरपंच पदावरून उर्वरित कालावधी अपात्र घोषित करण्यात आले आहे.

या अपात्र आदेशात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांनी प्रतिवादी कौशाबाई चांगदेव थोरात, सरपंच, ग्रामपंचयत खंडाळा वैजापूर यांच्या विरोधातील गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वैजापूर यांच्या चौकशी अहवाला आधारे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम,१९५८ चे कलम ३९(1) अन्वये कार्यवाही करणे बाबतचा दाखल केलेला प्रस्ताव जा.क्र. जिप औ /३ पंचायत/कावि -900/3034/2023, दिनांक 27/07/2023, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, छत्रपत्ती संभाजीनगर यांची धारणा खोटी व संशयास्पद असल्याने अमान्य करण्यात आल्याचे म्हटले असून तसेच प्रतिवादी श्रीमती कौशाबाई चांगदेव थोरात,सरपंच,ग्रामपंचायत खंडाळा,ता.वैजापूर,जि. छत्रपती संभाजीनगर यांनी त्यांचे सरपंच पदाचे कालावधीत केलेली नियमबाह्य कृती महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ चे कलम ३९(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृतीबद्दल दोषी आढळून आले असल्यामुळे त्यांना ग्रामपंचायत खंडाळा,ता.वैजापूर,जि. छत्रपती संभाजीनगर येथील सरपंच पदावरून सांप्रत ग्रामपंचायतच्या उर्वरीत कालावधीसाठी अपात्र घोषीत करीत आहे.

तसेच सर्व संबंधिताना सदरील आदेशाची प्रत कळवून प्रकरण या न्यायालयात बंद करण्यात आली असून ही संचिका अभिलेख कक्षात वर्ग करण्यात आली असल्याचे म्हटले आहे. सरपंच यांना अधिकार नसताना बनावट वारस प्रमाणपत्र बनवून दिले तथा विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या सुनावणीत सरपंच यांनी तोंडी म्हणणे मांडत माझी स्वाक्षरी त्या वारस प्रमाणपत्र नसून ती दुसरी कोणी केल्याचे म्हटले तसेच ग्रामविकास अधिकारी यांनी मी तेव्हा खंडाळा ग्रामपंचायत येथे कार्यरत नव्हतो असे म्हटले असून इतर सरपंच स्वाक्षरी चे काही पुरावे सादर केले यावरून स्वाक्षरी एकच असल्याचे लक्ष्यात आले म्हणून अन भविष्यात चुकीच्या कामात तसेच बेकायदेशीर पद्धतीने काम होऊ नये म्हणून श्रीमती कौशाबाई थोरात यांना उर्वरित ग्रामपंचायत कालावधीसाठी अपात्र ठरविण्यात आले आहे.या प्रकरणी ग्रामविकास अधिकारी आर शिनगारे यांनी आदेश प्राप्त झाला नसल्याचे म्हटले आहे.

विशेष म्हणजे जर सरपंच यांनी स्वाक्षरी केली नसेल तर स्वाक्षरी कोणाची याचा ही तपास होऊन कारवाई होणे गरजेचे आहे तसेच असाच काही प्रकार अजून झालेला तर नाही ना अशी खंडाळा पंचक्रोशीत चर्चा बघावायस मिळत आहे.

# कौशल्य प्रशिक्षणातून उघडले स्वयंरोजगाराचे नवे दालन

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** जागतिकीकरणाच्या युगात औद्योगिकीकरणावर भर देत कुशल व्यावसायिकांची मागणी वाढत आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी कौशल्यावर आधारित शिक्षणाची अत्यंत गरज आहे. विद्यार्थी त्यांच्या शैक्षणिक आणि पदवीधर कार्यक्रमादरम्यान ज्ञान मिळवत असतांना, खरे आव्हान रोजगारक्षम कौशल्यांच्या अभावामध्ये आहे. उत्पादकता वाढविण्यासाठी विविध क्षेत्रांना विशिष्ट कौशल्ये आवश्यक असतात. त्यामुळे कौशल्य-आधारित, व्यावसायिक प्रशिक्षण तरुणांना रोजगारक्षम बनवण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरते.

या प्रशिक्षणाच्या माध्यमातून येथील तरुण-तरुणींसाठी स्वयंरोजगाराचे नवे दालन उघडले आहे.

कौशल्य-आधारित, व्यावसायिक प्रशिक्षण विशिष्ट कौशल्य विकसित करण्यावर लक्ष केंद्रित करते जे विद्यार्थ्यांना अधिक रोजगारक्षम आणि बाजारपेठेतील मागणी लक्षात घेवून प्रशिक्षण देते. विद्यापीठ प्रशासनाच्या वतीने, विद्यार्थी कल्याणासाठी व रोजगार निर्मीतीसाठी विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहे. कौशल्याधारित आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची वाढती मागणी लक्षात घेता गोंडवाना विद्यापीठ व गडचिरोली, जिल्हा प्रशासनाच्या संयुक्त विद्यमाने, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे आणि तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मीना यांच्या संकल्पनेतून गोंडवाना विद्यापीठ परीसरात अल्फा अकॅडमी हा प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला.

अल्फा अकॅडमीच्या माध्यमातून आजतागायत 500 प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना संगणकीय कोडींगचे प्रशिक्षण देण्यात आले. विशेष म्हणजे, 233 विद्यार्थ्यांनी नॅस्कॉम ही प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण केली असून त्यापैकी 150 विद्यार्थ्यांनी इंटर्नशिप पुर्ण केली आहे. तर प्रशिक्षणाच्या माध्यमातून 45 विद्यार्थ्यांना रोजगार प्राप्त झाला असून जिल्हा प्रशासनाने अल्फा अकॅडमीतील 12 प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांची निवड देखील केली आहे. ही विद्यापीठाच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे.

कोडींग प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध संस्थांना वेबसाईट तयार करून दिल्या असून विद्यार्थी मोठे अर्थार्जन प्राप्त करीत आहे. ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फुल स्टॅक वेब डेव्हलपमेंट अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. तसेच C++, HTML, CSS, JS, सॉफ्ट स्किल ट्रेनिंगच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध संगणकीय कोडींगचे धडे मिळतील आणि विद्यार्थी स्वतः वेबसाईट तयार करू शकतील. त्यासोबतच, जिल्हयातील विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रातील तांत्रिक प्रशिक्षण मिळावे, या उद्देशाने विद्यापीठ परीसरात सी.आय. आय.आय.टी (CIIIT) प्रशिक्षण केंद्राची स्थापना करण्यात आली. सदर प्रशिक्षण केंद्राचे उद्‌घाटन राज्याचे मुख्यमंत्री यांच्या हस्ते 15 नोव्हेंबर 2023 रोजी पार पडले. सदर केंद्रामध्ये वार्षिक 1000 विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण देण्याचे मानस असून सदर प्रशिक्षण इंडस्ट्री 4.0 या तंत्रज्ञानावर आधारित असेल. सी.आय.आय.आय.टी (CIIIT) केंद्रात प्रशिक्षणासाठी 9 विभागातील विविध 18 कोर्सेस सुरू आहेत. यामध्ये, ऑटोमोबाईल सेक्टर, IOT, डिजिटल मॅन्युफॅक्चरिंग, अॅडव्हान्स मॅन्युफॅक्चरिंग इनोव्हेशन डिझाईन, मॅन्युफॅक्चरिंग एक्झिक्युशन सिस्टीम आदी क्षेत्रातील विविध कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित करण्यासाठी गोंडवाना विद्यापीठातील आदर्श पदवी महाविद्यालयात कौशल्य विकास केंद्राचे उद्‌घाटन देखील नुकतेच करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या नवसंकल्पनांचा शोध घेणे व त्यांचे नवउद्योजकतेचे स्वप्न साकार करणे व योग्य पाठबळ पुरविण्यासाठी (TRICEF) ट्रायसेफ नवसंशोधन केंद्राची स्थापना करण्यात आली. केवळ नोकरीवर अवलंबून न राहता युवकांनी स्वयंरोजगार निर्माण करावा, त्यांना स्वावलंबी होता यावे यासाठी गोंडवाना विद्यापीठ संचलीत ट्रायसेफचे कार्य सुरु आहे. शिक्षणातून नोकरी व उद्योजकता वाढीस लागणे आणि येथील आदिवासी समाजाचा आर्थिक स्तर वाढविणे हा प्रशिक्षणाचा उद्देश आहे. बदलत्या काळात फक्त पारंपारिक शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास व त्यांचे भावी जीवन सुखकर करण्यास पुरेसे नाही. त्यामुळे डिजिटल कौशल्यावर आधारित शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. नियमित अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांनी वेगवेगळी कौशल्ये आत्मसात केली तर त्याचा निश्चितच फायदा होईल.



# मुंबईतील उबाठा गटातील अनेक उपशाखा प्रमुख, गटप्रमुखांचा भाजपामध्ये प्रवेश


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** उद्धव ठाकरेंनी हिंदुत्व सोडल्याने सामान्य कार्यकर्त्यांची घुसमट होत असल्याने हे कार्यकर्ते नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करत आहेत, असे मुंबई भाजपा अध्यक्ष आ. आशीष शेलार यांनी शुक्रवारी सांगितले. चेंबूर व गोवंडी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना उबाठा गटातील उपशाखा प्रमुख, गटप्रमुख, कार्यालय प्रमुख अशा 200 हून अधिक जणांनी सार्वजनिक बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण, भाजपा मुंबई अध्यक्ष आ. आशिष शेलार यांच्या उपस्थितीत शुक्रवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. या वेळी आ. शेलार पत्रकारांशी बोलत होते.भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्ष प्रवेशाच्या कार्यक्रमाला भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेश शिरवाडकर,जगदीश पराडकर, महादेव शिगवण, नीरज उभारे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी कार्यालय प्रमुख राजेंद्र भोईर, उपशाखा प्रमुख आनंद नलावडे, संतोष मिटकर, संजय वैती, प्रफुल्ल ठाकूर, रमेश उगले, गटप्रमुख राजेंद्र पवार, संजीव वर्तक,विठ्ठल जाधव, उपशाखा प्रमुख जगदीश पंडित, अर्चना गावंड,अंजली पाटील आदींनी भाजपामध्ये प्रवेश केला.

# प्रार्थनेसह जागरण, शाही जेवण, खीर, मिठाई आदींची मेजवानी शब-ए-कदर होणार साजरी

आधुनिक केसरी न्यूज

**मेहकर :** लैलतूल कद्र किंवा शब-ए-कदर म्हणजे रात्र अल्लाहने शब-ए-कदरमध्ये पवित्र कुराण अवतरित केले. शब-ए-कदर ही हजार महिन्यांपेक्षा एक उत्तम रात्र आहे. या रात्रीत देवदूत अवतरतात. आपल्या पालनकर्त्यांच्या आदेशाने फरिश्ते आणि रूह म्हणजेच जिब्रील अवतरित होतात. ही रात्र पूर्णपणे सुख आणि शांतीची आहे, असा धार्मिक समज ठेवूनच मुस्लिम बांधव या रात्रीला जागरण करतात. यावर्षी शनिवारी (दि. 6) ही रात्र आहे.मुस्लिम धर्मात शबे कदर म्हणजेच जागण्याच्या रात्रीचे महत्त्व इतर रात्रींपेक्षा अधिक आहे. या रात्रीला जो जागून उपासना करेल, तो अनेक महिन्यांच्या रात्रीला उपासना केल्याची बरोबरी साधेल, असे म्हटले जाते. तरीही हजरत मुहम्मद सल्ललाहु अलैहुसल्लम यांनी या रात्रीला जागून



याचना करण्यास सांगितले. विशेषतः रमजान महिन्यात, ताक (विषम) तारखांच्या रात्रीला या कदरच्या रात्रीला शोधून याचना करण्यास सांगितले आहे. परंतु रमजान महिन्यात काही लोक सर्वच रात्री, तर काही फक्त विषम रात्री आणि काही तर रमजानच्या 25 व्या आणि 27 व्या रात्री उपासना करतात. यानिमित्ताने अनेकजण शाही जेवण, खीर, मिठाई आदींची मेजवानी देतात, तसेच छान छान कपडे घालतात. अल्लाहने याच रात्री आदम अलैहीसलाम निर्माण केले. या रात्री जन्नतमध्ये वृक्षारोपण केले होते. तसेच या रात्री इतरही अनेक पवित्र घटना घडल्या होत्या. म्हणूनच या रात्रीला खूप महत्त्व आहे. याच रात्रीच्या सुमारास कमी वेळात अनेक सत्कर्म साध्य करता येतात. ही रात्र पश्चात्ताप स्वीकारण्यासाठी एक विशेष वेळ आहे. पालकांची अवाज्ञा करणारा, दारू पिणारा, नातेवाइकांशी गैरवर्तन करणारा, कपट बाळगणारा व्यक्ती आदींना या रात्री क्षमा केली जात नाही. जर त्यांनी खंबीरपणे व प्रामाणिकपणे अल्लाहच्या नावाने पश्चात्ताप व्यक्त केला तर त्यांनाही क्षमा मिळते, असे मुस्लिम धर्मात मानले जाते. डोणगाव येथे या रात्रीनिमित्त मुस्लिम बांधव एकवटणार आहेत.

# भाजपाने नारीशक्तीवर बोलावे हे आश्चर्यकारक

## काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** भारतीय जनता पक्ष, तसेच त्यांचे सर्वोच्च नेते यांनी महिलांचा सातत्याने अपमान केला आहे. भाजपाच्या नेत्यांची महिलांबद्दल काय धारणा आहे ते जगाने पाहिले आहे. काँग्रेची विधवा, ५० करोड की गर्लफ्रेंड, दिदी ओ दिली, शर्पूणखा असा उल्लेख करुन महिलांचा अपमान करणे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींना शोभते का? याचे उत्तर आधी भाजपाच्या महिला प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांनी द्यावे व नंतर नारीशक्तीच्या अपमानावर बोलावे, असे सडतोड उत्तर काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे यांनी दिले आहे.

चित्रा वाघ यांच्या प्रसिद्धीपत्रकाचा समाचार घेत काँग्रेस महिला प्रदेशाध्यक्ष संध्याताई सव्वालाखे म्हणाल्या की, भाजपाने महिला अत्याचारावर बोलावे हेच आश्चर्यकारक आहे. ज्या महिला खेळाडूंनी जगात भारताची मान उंचावली त्या महिला खेळाडूंवर लौंगिक अत्याचार करणारा भाजपाचा खासदार ब्रिजभूषण सिंह याच्यावर कारवाई का केली नाही. या अत्याचारावर भाजपा गप्प का, चित्राताई वाघ यावर कधीच बोलल्या नाहीत. मणिपूरमध्ये महिलांची विवस्त्र धिंड काढली, त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले त्यावेळ चित्राताई वाघ कुठे होत्या ? काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांच्याबद्दल अत्यंत खालच्या पातळीवर बोलणारे भाजपाचेच लोक आहेत. काँग्रेसची विधवा, ५० करोड की गर्लफ्रेंड, शर्पूणखा असे जाहीरपणे म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी महिलांचा सन्मान केला आहे असे चित्राताई वाघ यांना वाटते का? बिल्कीस बानोवर सामुहिक बलात्कार करून तीच्या घरातील लोकांच्या हत्याप्रकरणी जेलची हवा खात असलेल्या ११ नराधमांना मुक्त करून त्यांचे स्वागत करत मिठाई वाटणे हा नारीशक्तीचा सन्मान वाटतो का?

महिलांबद्दल जर कोणी अपमानास्पद बोलत असेल तर त्याचा निषेधच केला पाहिजे पण महिला अत्याचारावर सोयीस्कर भूमिका घेणे हेही तितकेच निषेधार्ह व घातक आहे. चित्राताई वाघ यांची भूमिका केवळ राजकीय असून हेमा मालिनींचा त्यांना आलेला पुळका इतर महिल्यांवर अत्याचार होतो, नारीशक्तीचा अपमान होतो त्यावेळी कुठे जातो. राहुलजी गांधी यांच्याबद्दल बोलण्याची चित्राताई वाघ यांची पात्रता नाही, आधी त्यांनी त्यांचे सर्वोच्च नेते नरेंद्र मोदी यांना महिलांबाबत सन्मानाने बोलण्यास सांगावे व नंतर राहुलजी गांधी यांच्याबद्दल बोलावे. शिवसेनेच्या एका मंत्र्यांवर बेछूट आरोप करणाऱ्या चित्राताई वाघ आज त्यांच्याच बरोबर सत्तेत मस्त आहेत, त्यावरही कधीतरी चित्राताईंनी तोंड उघडावे, असे संध्याताई सव्वालाखे म्हणाल्या.

# स्वातंत्र्याच्या पंच्याहत्तरीनंतरही भरवासियांची पाण्यासाठी पायपीट

## धरण उशाला अण् कोरड घशालागत स्थिती

आधुनिक केसरी न्यूज

**विनोद पाटील बोडखे**

**रिसोड :** तालुक्यातील लोणी बू येथून जवळच असलेल्या भर जहागीर गावातील नागरिकांना मार्च महिन्याच्या अखेर पासूनच भीषण पाणी टंचाई चा सामना करावा लागत आहे.हे गाव तालुक्यातील मोठ्या गावांच्या यादीमध्ये गणल्या जाते.या गावाची लोकसंख्या जवळपास सात हजारांच्या आसपास आहे.गावातील जलस्वराज्य प्रकल्प हा अगदी हाकेच्या अंतरावर असलेल्या मोरगव्हाण सिंचन तलावाच्या काठावर असुन मुबलक पाणी उपलब्ध असतांनाही येथिल नळयोजना द्वेषाच्या राजकारणाचा बळी ठरल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

भर जहागीर गावाची ओळख ही सतत पाणी टंचाईग्रस्त गाव म्हणून सर्वदूर झाल्याने या गावातील नागरिकांना आपल्या मुलीचा विवाह करतांना पाण्याच्या भीषण पाणी टंचाई मुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. सन 2007 मध्ये शासणाच्या सुमारे सत्तर लक्ष रूपयांच्या 'जलस्वराज्य प्रकल्पाने' भर जहागीर गावामधे मुबलक पाणी मिळाल्याने

> ग्रामस्थांवर जी पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे .त्या संदर्भात तात्काळ जलस्वराज्य प्रकल्पा वरील बंद पडलेला मोटारपंप सुरू करून ग्रामस्थांना नियमित पाणी पुरवठा करण्यात येईल .
> पि . बि .घुगे ग्रामसेवक भर जहागीर
>
> पाणी पुरवठा करण्यासाठी वापरण्यात येणारा विद्युत पंप नादुरुस्त असल्याने मागील जवळपास दीड महिन्यापासून गावातील पाणी पुरवठा बंद आहे . लवकरच पाणी पुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रयत्न सुरू असून ग्रामस्थांना सुरळीत पाणी पुरवठा करण्यात येईल .
> पि .के .चोपडे सरपंच भर जहागीर

गावाला लागलेला पाणी टंचाईचा शाप थांबला,तालुक्यातील मोठ्या गावामध्ये भर जहागीर चा समावेश होतो.येथे शासणाचा प्रकल्प यशस्वी झाल्याने प्रती व्यक्ती चाळीस लिटर पाणी मिळत आसल्याने अल्पावधीतच जलस्वराज्य प्रकल्पाच्या माध्यमातून गावाने पाणीटंचाईवर मात केली होती.या जलस्वराज्य प्रकल्पाने सुमारे चौदा वर्षे ग्रामस्थांना नियमित पाणी पुरवठा पुरविला परंतु मागील पाच वर्षा मध्ये स्थानिक ग्रामपंचायत ने जलस्वराज्य प्रकल्प ताब्यात घेतला आणि सदर प्रकल्पाला कायमची घरघर लागली. मागील पाच वर्षा मध्ये मोठ्या प्रमाणात याच



जलस्वराज्य प्रकल्पावर स्थानिक ग्रामपंचायत ने मोठा खर्च केला.परंतु गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी ग्रामपंचायत ची उठाठेव अपयशी ठरली.गावाला लागुणच मोरगव्हाण सिंचन तलाव आहे.याच तलावाच्या काठा लगत भर जहागीर जलस्वराज्य प्रकल्पाची विहीर आहे.एप्रिल महिन्या मध्ये या विहीराला मुबलक पाणी आहे. जलस्वराज्य प्रकल्पाच्या नळयोजनेचा मोटारपंप बंद पडल्याने मागील एक महिण्या पासुन गावाला तिव्रपाणी टंचाईचे चटके सोसावे लागत आहे.ग्राम प्रशासनाच्या नाकर्तेपणाचा त्रास मात्र ग्रामस्थांना सहन करावा लागत आहे.ऐन एप्रिल महिन्यात ग्रामस्थ पाण्यासाठी भटकंती करीत आसतांनी स्थानिक ग्रामपंचायत प्रशासण.मात्र मुगगीळुन गप्प दिसत आहे.



# सिंधू सेवा दलातर्फे 'चेटीचंड' महोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** सिंधी समाजाचे नूतन वर्ष व भगवान साई झुलेलाल यांच्या १०७४ व्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे 'चेटीचंड' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या बुधवारी (दि. १० एप्रिल) हा महोत्सव डेक्कन कॉलेज बँक्वेट हॉल, डेक्कन कॉलेज ग्राउंड, बॉम्बे संपर्स जवळ, येरवडा, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती सिंधू सेवा दलाचे अध्यक्ष अशोक वासवानी यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी सिंधू सेवा दलाचे माजी अध्यक्ष सुरेश जेठवानी व दीपक वाधवानी, विजय दासवानी, सचिव सचिन तलरेजा, खजिनदार राजेंद्र फेरवानी, जनसंपर्क अधिकारी देवेंद्र चावला आदी उपस्थित होते. अशोक वासवानी म्हणाले, "चेटीचंड महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम आणि सिंधी समाज बांधवांचा मेळावा होणार आहे. भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून सामाजिक आणि सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात होईल. मुंबईतील प्रसिद्ध गायक शुभम नाथानी आणि टीम, नागपूरची प्रतिभावान गायिका दृष्टी कुकरेजा, राजस्थानचे उत्कृष्ट गायक मास्टर हर्षल यांचा लाईव्ह कॉन्सर्ट आणि जयपूर येथील विनोदवीर भाग्यश्री दर्यानी सादरीकरण करणार आहे. सिंधी समाजात कपिल शर्मा अशी ओळख असलेल्या मोहित शेवानी कार्यक्रम संचालित करणार आहे. जनरेशन नेक्स्ट डान्स अकॅडमीतर्फे नृत्यकलेचे सादरीकरण होणार आहे. त्यानंतर प्रीतिभोजने (महाप्रसाद) महोत्सवाची सांगता होईल. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील चार हजार अधिक सिंधी बांधव या महोत्सवात सहभागी होतील"

या महोत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आसवानी प्रोमोटर्स अँड बिल्डर्सचे संस्थापक संचालक श्रीचंद आसवानी असणार आहेत. निवृत्त न्यायाधीश व महाराष्ट्राचे लोकायुक्त एम. एल. तहालियानी आणि बीजे मेडिकल महाविद्यालयातील निवृत्त सहयोगी प्राध्यापक डॉ. लछमनदास फेरवानी यांच्यासह सिंधी समाजातील मान्यवर व्यक्तींचा सन्मान करण्यात येणार आहे. सिंधी समाजाचा विकास करून समाजाच्या संस्कृतीविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे व सिंधू समाजाच्या परंपरा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचा आमचा मानस आहे. सिंधू सेवा दल गेली ३७ वर्ष कार्यरत आहे, असे सुरेश जेठवानी यांनी नमूद केले.

# सारथी, मॅजिक संस्थेतर्फे स्टार्टअपसाठी इन्क्युबेशन प्रोग्रॅमची घोषणा

## निवड झालेल्या 10 स्टार्टअप्सना मिळणार प्रतिमाहिना 25, 000 अर्थसाहाय्य

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) उद्योजकता विकास केंद्र सुरू करण्यात आले असून या संस्थेच्या माध्यमातून सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास (इन्क्युबेशन) योजना महाराष्ट्रातील निवडक स्टार्टअप इंक्युबेटरच्या सहकार्यातून राबविण्यात येत आहे. या उपक्रमामध्ये मार्च महिन्याच्या सुरवातीला छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा ॲक्सिलरेटर फॉर ग्रोथ अँड इनक्युबेशन कौन्सिल (मॅजिक) संस्थेची निवड करण्यात आली असून, सदर उपक्रमासाठी महाराष्ट्राच्या टिअर 2 आणि 3 शहरातील रहिवासी असलेल्या विशेषतः मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, आणि कुणबी-मराठा समुदायांतील नवउद्यमींना, त्यांच्या नवीन विचारांना व्यवसायिक उत्पादनांत रूपांतरित करण्याच्या उद्दिष्टाने एका वर्षासाठी सारथी आणि मॅजिक संस्थेतर्फे इंक्युबेशन प्रोग्रॅम राबविण्यात येणार आहे. यामध्ये निवड झालेल्या 10 स्टार्टअप्सना एक वर्षासाठी प्रति महिना 25000 रुपये अर्थसहाय्य (सीड ंड) देण्यात येणार आहे. **प्रोग्रॅममध्ये समावेश होण्याच्या अटी :** सदर उमेदवार मराठा, कुणबी, मराठा-कुणबी, आणि कुणबी-मराठा या गटातील असावा, अर्जदार किमान पदवीधर असावा,- विद्यार्थ्यांकडे स्वतःची तंत्रज्ञान व्यवसाय कल्पना असावी व एका वर्षामध्ये त्याने त्याच्या कल्पनेचे रूपांतर स्केलेबल टेक्नॉलॉजी बिझनेस स्टार्टअपमध्ये करणे आवश्यक राहील, - क्रीमी लेयर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे, - कुटुंबाची वार्षिक उत्पन्न ८ लाखपेक्षा जास्त नसावे, यापूर्वी सारथी योजनेचा लाभार्थी नसावा. वरील मापदंडांसह पात्र असलेल्या स्टार्टअप्सनी निवड प्रक्रियेसाठी HTTPS://BIT.LY/SARTHI_MAGIC लिंकवर नोंदणी करावी अशी माहिती मॅजिकच्या वतीने देण्यात आली. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 16 एप्रिल 2024 असून, या इंक्युबेशन प्रोग्राम संदर्भात सविस्तर माहितीसाठीONTACT@MAGICINCUBATION.COM या इमेलवर संपर्क साधावा असे मॅजिकच्या वतीने सांगण्यात आले.

> **इनक्युबेशन केंद्राविषयी थोडक्यात :** योजना कुणासाठी ?राज्यातील मराठा, कुणबी, मराठा–कुणबी व कुणबी–मराठा या गटातील तरूण विद्यार्थी किंवा नवोद्योजकांसाठी कशी होणार निवड ? ज्यांच्याकडे व्यवसाय कल्पना आहे . त्याला अंतिम स्वरूप देऊन नविन व्यवसाय निर्मिती करू शकेल अशा १० लाभार्थ्यांची निवड होणार . अर्थसाहाय्य किती मिळणार ? एका वर्षासाठी २५ हजार रुपये प्रति महिना आर्थिक साहाय्य देणार सुविधा काय मिळणार ? सारथी संस्थेने निवड केलेल्या नवउद्योजकांना मॅजिक संस्थेमध्ये एक वर्षाकरिता मार्गदर्शनासाठी दिले जाईल . केंद्रातील कार्यालयीन जागा, तज्ञांचे मार्गदर्शन आणि मॅजिक तसेच सारथीच्या विविध उपक्रमात सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे .

# पाण्याविना परिस्थिती बिकट होत चालली आहे

## प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला सुनावले

आधुनिक केसरी न्यूज

**सांगली :** एप्रिल महिन्याची सुरुवात झाली असून यंदा पुरेसा पाऊस झाला नसल्याने संपूर्ण महाराष्ट्रात पाण्याची प्रचंड टंचाई जाणवत आहे. पश्चिम महाराष्ट्रातील पाण्याच्या टंचाईवर राष्ट्रवादी कॅांग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी यावर सरकारला चांगलेच सुनावले आहे. वाटाघाटीसाठी दिल्ली - मुंबई करणाऱ्यांनी धोरणात्मक निर्णय घेतले असते तर आज ही परिस्थिती नसती असे ते म्हणाले. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आपल्या एक्स हँडलवरून ही प्रतिक्रिया दिली आहे. ते आपल्या प्रतिक्रियेत म्हणतात की, सत्तेसाठी वाटेल ते करणाऱ्या सत्ताधाऱ्यांनी जरा इकडेही पहावे! सांगली, सातारा व सोलापूरमध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य निर्माण झालेले आहे. दिवसेंदिवस ही स्थिती बिकट होत चालली आहे. विहिरी - तलावांनी तळ गाठला आहे. सांगली जिल्ह्यात टँकरची मागणी १३%नी वाढली आहे. वारणा धरणात केवळ २३% पाणी शिल्लक आहे. एप्रिल महिन्यातच ही परिस्थिती आहे तर मे मध्ये काय परिस्थिती असणार?

मान, खटाव, आटपाडी, जत कवठेमहांकाळ, सांगोला, मंगळवेढा या गावातील तलाव काही काळातच कोरडे पडणार आहेत. पाण्याविना जगायचं कसं? शेती करायची कशी? इतक्या गंभीर मुद्द्याकडे सत्ताधाऱ्यांनी दुर्लक्ष केले. वाटाघाटीसाठी दिल्ली - मुंबई करणाऱ्यांनी आधीच धोरणात्मक निर्णय घेतले असते तर आज ही परिस्थिती उद्भवली नसती.

# चीनच्या घुसखोरीवर मल्लिकार्जुन खरगेंची टीका

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** चीनने भारतीय भूमीत घुसखोरी केल्याच्या प्रकरणावरून कॅांग्रेसने पंतप्रधान मोदी यांच्यावर टीकास्त्र सोडले आहे. कॅांग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी गुरुवारी राजस्थानमधील चित्तोडगड येथे एका जाहीर सभेला संबोधित करताना भारत-चीन वादावरून पंतप्रधान मोदींना लक्ष्य केले. पंतप्रधान मोदी हे 'खोटारड्यांचे सरदार' आहेत, अशी उपमाही त्यांनी दिली. चीन भारतीय भूमीवर कब्जा करत असताना पंतप्रधान मोदी हातावर हात ठेवून बसले आहेत. सीमेवर उदासीनता दाखविणारे मोदी आपल्या भाषणात मात्र गांधी कुटुंबावर टीका करतात. पण याच कुटुंबाने देशासाठी बलिदान दिले आहे, हे ते विसरतात, अशी टीका खरगे यांनी केली.चीन भारतीय प्रदेशात घुसखोरी करत असताना पंतप्रधान मोदी यांनी झोपेच्या गोळ्या घेतल्या आहेत का? असाही सवाल खरगे यांनी उपस्थित केला. खरगे पुढे म्हणाले, "पंतप्रधान मोदींची छाती ५६ इंचाची आहे आणि ते कुणालाही घाबरत नाहीत, तर मग भारताच्या भूमीचा एका मोठा भाग त्यांनी चीनला गिळंकृत का करू दिला.ते आपल्या देशात घुसखोरी करत आहेत आणि तुम्ही झोपेत आहात का? तुम्ही झोपेच्या गोळ्या घेतल्या आहेत का? किंवा राजस्थानच्या शेतामधील अफू तुम्ही घेऊन गेला आणि ती खाल्ली का?

असाही प्रश्न खरगे यांनी विचारला. याशिवाय केंद्रीय यंत्रणांच्या गैरवापरावरूनही खरगे यांनी मोदींवर टीका केली. विरोधकांना केंद्रीय यंत्रणांचा वापर करून नामोहरण करणारे केंद्र सरकार हेच भ्रष्ट नेते जेव्हा भाजपामध्ये येतात, तेव्हा त्यांना अभय देते, असाही आरोप त्यांनी केला. खरगे म्हणाले की, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह ही मोठी वॉशिंग मशीन आहे.



# तीव्र उन्हाचा तडाखा, बाजारही तुरळक

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** खुलताबाद तालुक्यातील बाजार सावंगी येथे व परिसरात सर्कलमध्ये सद्या तीव्र उन्हाचा तडाखा बसत असून दैनंदिन जीवन व्यवहारा बरोबरच आठवडी बाजारावर ही परिणाम जाणवत असुण दि.५आठवडीबाजार तुरळक भरले होते. तीव्र उन्हामुळे अंगाची लाही लाही होत असुण गुरेढोरे प्राणी पक्षोपक्षी कसेबसे सैरभैर झाले आहे. मे महिन्यांतील उन्हाच्या झळाया एप्रिलपासून नागरिकांना सोसाव्या लागत आहे. सकाळी दहा वाजेपासूनच तीव्रकडक उन्ह उन्हाच्या झळाया सोसाव्या लागत आहे. तर दैनंदिन जीवन व्यवसाय मजुरीवर परिणाम स्पष्ट दिसून येते आहे. तर दि.५ शुक्रवारी येथील आठवडी बाजारात तीव्र उन्ह उन्हाच्या झळाया मुळे पंचक्रोशीतील व तालुका जिल्ह्यातील बाजारकरु व्यापारी नागरिक पोहचले नाही बाजारांत तुरळक नागरिक बाजारकरु दिसून आले. यंदा तीव्र कडक उन्ह पडत असुण मे महिना पुढेच आहे तर एप्रिलपासून पासूनच तापमानात मोठी वाढ झाली आहे. त्यात लग्नतिथी शालेय महाविद्यालयीन परिक्षा पावसापुर्वीची शेतात शेतीकाम मेहनत उन्हाच्या तडाख्यामुळे होत नाही. दैनंदिन कामे व्यवहार सर्वांवर उन्हाचा तडाखा परिणाम जाणवत आहे.त्यात मे महिन्यातील उन्हाबद्दल न बोललेलेच बरे.बाजारात मोठ्या प्रमाणात हिरवे पालेभाज्या आल्या मात्र खरेदीदार बाजार करूनच आभाव दिसून आला.तीव्र कडक उन्हाच्या झळाया मुळे नागरिक बाजार ऐवजी घरीच थांबणे पसंत करत आहे. बाजारात सुमसाम रस्ते गल्ल्या सामसुम आदि असे चित्र आहे.